POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-१२४ ● मुंबई, रविवार, ०७ डिसेंबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

- 'डिजिटल अरेस्ट' प्रकरणांमध्ये बँकर्सच्या भूमिकेची चौकशी करण्यासाठी आणि भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत कारवाई करण्यासाठी सीबीआयला पूर्ण स्वातंत्र्य देण्यात आले आहे.
- आरबीआयला नोटीस : अशा पुनरावृत्ती होणाऱ्या सायबर गुन्ह्यांची ओळख पटविण्यासाठी एआय आणि मशीन लर्निंगचा वापर का केला जाऊ शकत नाही, असा सवाल सर्वोच्च न्यायालयाने केला.
- आयटी मध्यस्थांना निर्देश : 'डिजिटल अरेस्ट' प्रकरणांच्या तपासात सीबीआयला संपूर्ण डेटा सहाय्य प्रदान करा.
- 'डिजिटल अरेस्ट' घोटाळ्याशी संबंधित प्रकरणांची चौकशी सीबीआयकडे सोपवा, ज्यामुळे देशभरात एकसंध तपास शक्य होईल. तपासात मदत करण्यासाठी सीबीआय प्रत्येक राज्यातील एका पोलीस अधिकाऱ्याची ओळख पटवेल.
- 'डिजिटल अरेस्ट' प्रकरणांमध्ये आंतरराष्ट्रीय संबंधांची चौकशी करण्यासाठी इंटरपोलची मदत घेईल.
- टेलिकॉम ऑपरेटर्सना निर्देश : तपासात पूर्ण सहकार्य करा - एकाच नावाने अनेक सीम कार्ड जारी करण्यावर न्यायालयाने चिंता व्यक्त केली.
- सीम कार्डचा गैरवापर रोखण्यासाठी सविस्तर उत्तर दाखल करण्याचे निर्देश दूरसंचार विभागाला देण्यात आले.

### डिजिटल अरेस्ट घोटाळ्यांची चौकशी सीबीआयकडे द्या

## सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश




**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक,**

सर्वोच्च न्यायालयाने सायबर गुन्ह्यांशी संबंधित 'डिजिटल अरेस्ट' प्रकरणांच्या चौकशीबाबत एक महत्त्वाचा आदेश जारी केला आहे. 'डिजिटल अरेस्ट' घोटाळ्याकडे त्वरित लक्ष देणे आवश्यक आहे. 'डिजिटल अरेस्ट' घोटाळ्याशी संबंधित प्रकरणांची चौकशी सीबीआय करेल. अशा प्रकरणांची चौकशी करण्यासाठी सीबीआयला विशेष अधिकार देण्यात आले आहेत, जिथे जिथे सायबर गुन्ह्यांमध्ये वापरलेली बँक खाती आढळतील तिथे सीबीआयला संबंधित बँकर्सची चौकशी करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य असेल, असे सोमवारी सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले. या प्रकरणाच्या सुनावणी दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, इतर घोटाळ्यांप्रमाणे, सीबीआय प्रथम 'डिजिटल अरेस्ट' घोटाळ्याच्या प्रकरणांची चौकशी करेल. सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी एजन्सीला अधिक अधिकार देत, पीसीए (भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा) अंतर्गत बँकर्सच्या भूमिकेची चौकशी करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य सीबीआयला दिले आहेत. जिथे अशा 'डिजिटल अरेस्ट' घोटाळ्यांसाठी बँक खाती उघडण्यात आली होती. सर्वोच्च न्यायालयाने रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (आरबीआय) ला नोटीस बजावली आहे, ज्यामुळे ती या स्वतःहून प्रकरणात पक्ष बनली आहे.



## संविधान अमृत महोत्सवी वर्षानिमित्त डिजिटल संविधान चित्ररथाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

**■मुंबई। प्रतिनिधी,**

राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत संविधान अमृत महोत्सवी वर्षानिमित्त डिजिटल संविधान चित्ररथ तयार करण्यात आलेला आहे. या चित्ररथाचे आज दिनांक ०६ डिसेंबर, २०२५ रोजी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते रवींद्र नाट्य मंदिराच्या प्रांगणात, प्रभादेवी मुंबई येथे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री श्री. मंगलप्रभात लोढा, माजी राज्यमंत्री भाई गिरकर, श्री बिभीषण चवरे, संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, श्रीमती मीनल जोगळेकर, संचालक पु ल देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी व इतर मान्यवर उपस्थित होते. पाक-अफगाण सीमेवर पुन्हा एकदा युद्धसदृश परिस्थिती! शेकडो कुटुंबांनी सोडली घरं हा चित्ररथ राज्यात विविध ठिकाणी फिरणार आहे. या चित्ररथामध्ये संविधानाची माहिती, संविधानाच्या मुलतत्त्वावरील माहिती, महत्त्वाची घडामोडी व लोकशाहीच्या मुल्यांवरील कलात्मक सादरीकरण व याबाबतचे प्रदर्शन बघायला मिळेल. या चित्ररथाद्वारे संविधान बाबतची जनजागृती करण्यात येणार आहे. संविधानाची माहिती सर्वसामान्यांना माहित व्हावी, या उद्देशाने या चित्ररथाची निर्मिती करण्यात आलेली आहे. राज्यातील जास्तीत जास्त जनतेने या चित्ररथ प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केले आहे.

## मुंबईकरांचे पुन्हा हाल!

### ८ ते ९ डिसेंबरदरम्यान महापालिकेकडून पाणीकपात

### कोणत्या भागांवर होणार परिणाम?



**■मुंबई। प्रतिनिधी,**

काही दिवसांपूर्वीच ३ आणि ४ डिसेंबर रोजी होणारी पाणी कपात रद्द करण्याचा निर्णय घेतल्याने मुंबईकरांना दिलासा मिळाला होता. मात्र तो आनंद फार काळ टिकला नाही. महापालिकेने पुन्हा एकदा शहरात पाणी कपात लागू करण्याचा निर्णय घेतला असून, ८ डिसेंबर सकाळी १० वाजल्यापासून ते ९ डिसेंबर सकाळी १० वाजेपर्यंत मुंबईत तब्बल १५ टक्के पाणी कपात होणार आहे.

पाणी कपातीचे कारण म्हणजे तानसा धरणातून भांडुप जलशुद्धीकरण केंद्राकडे जाणारी २७५० मिमी व्यासाची तानसा जलवाहिनी बदलण्याचे काम. हे दुरुस्तीचं काम अत्यंत महत्त्वाचं असल्यामुळे महापालिकेला पाणी कपात अपरिहार्य ठरली आहे. याच कारणासाठी ३-४ डिसेंबरदरम्यान पाणी कपात जाहीर केली होती; मात्र महापरिनिर्वाण दिनानिमित्त शहरात मोठ्या प्रमाणात नागरिक येतात, होणाऱ्या गैरसोयीचा विचार करून ती कपात रद्द करण्यात आली होती. यामुळे नागरिकांना दिलासा मिळाला होता परंतू आता परत त्यांना पाणी कपातीच्या समस्यांचा सामना करावा लागणार आहे.

**कोणत्या विभागांमध्ये पाणी कपात?**

- शहर विभाग : ए, सी, डी, दक्षिण-जी, उत्तर-जी
- पश्चिम उपनगर : एच-पूर्व, एच-पश्चिम, के-पूर्व, के-पश्चिम, पी-दक्षिण, पी-उत्तर, आर-दक्षिण, आर-उत्तर, आर-मध्य
- पूर्व उपनगर : एन, एल आणि एस विभाग

मात्र आता ही कपात दोन दिवसांनी पुढे ढकलून ८-९ डिसेंबर रोजी लागू करण्यात येत आहे. त्यात आणखी एक महत्त्वाचा बदल म्हणजे, आधी १४ विभागांत होणारी ही कपात आता १७ प्रशासकिय विभागांमध्ये लागू राहणार आहे. यामुळे शहरापासून उपनगरांपर्यंत लाखो नागरिकांना पाणीटंचाईचा मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. मुंबईत गेल्या काही काळापासून, नागरिकांचे आधीच पाण्यामुळे हाल होत आहेतय त्यात आता आणखी पाणी कपात केल्यामुळे त्यांच्या अडचणी वाढणार आहेत.

महापालिकेने नागरिकांना ८ डिसेंबरच्या आधी पाणी साठवून ठेवण्याचा आणि पाणी जपून वापरण्याचा सल्ला दिला आहे. तसेच दुरुस्तीची कामे सुरळीत पार पडण्यासाठी सहकार्याची विनंतीही केली आहे.



### राज्यातील निवडणुकांचे निकाल २१ डिसेंबरलाच

## मतमोजणीवर 'सर्वोच्च' आदेश

**निकाल एकाच दिवशी होणार जाहीर**

प्रलंबित न्यायप्रक्रियेमुळे २० नगरपरिषदांमध्ये मतदान उशिरा होत आहे. वेगवेगळ्या दिवशी निकाल जाहीर झाल्यास गैरसमज व गोंधळ निर्माण होऊ शकतो, अशी याचिकाकर्त्यांची भूमिका कोटार्ने मान्य केली होती. त्यामुळे निकाल एकाच दिवशी जाहीर करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्या निर्णयांवर ठाम भूमिका घेत सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, राज्यातील सर्व नगरपरिषदझ्नगरपंचायत निवडणुकांचे निकाल २१ डिसेंबरला एकत्रितरीत्या जाहीर होणार आहेत.

**■ मुंबई। प्रतिनिधी,**

महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये मंगळवारी (दि.२) २६४ नगरपरिषद व नगरपंचायतींसाठी निवडणुका पार पडल्या. त्यानंतर सर्व नगरपालिका व नगरपंचायत निवडणुकांचा निकाल २१ डिसेंबरला एकत्र जाहीर करण्याचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिला होता. त्यावर आता (दि.५) सर्वोच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केला आहे. मतदान झाले असले तरीही २१ डिसेंबरच्याआधी मतमोजणी करण्यास न्यायालयाने नकार दिला आहे.

**निवडणूकांची मतमोजणी थांबवू नये**

उच्च न्यायालयातील याचिकांचा परिणाम होऊन निवडणुका पुढे ढकलल्या जाणार नाहीत, याची खबरदारी घेण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाकडून देण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाने नागपूर खंडपीठाचा आदेश कायम ठेवला आहे. "पुढील नियोजित निवडणूका जर २० तारखेला काही कारणांनी होऊ शकल्या नाही तर याआधी झालेल्या निवडणूकांची मतमोजणी थांबवू नये," असा आदेशही सर्वोच्च न्यायालयाकडून देण्यात आला आहे.

**निवडणुका पुढे ढकलण्याचा अधिकार नाही**

सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठासमोर मतमोजणीची सुनावणी झाली. यावेळी खंडपीठाने निवडणुकांचा कालावधी ३१ जानेवारीपर्यंत मर्यादित असल्याचे सांगितले. "कोणालाही कोणत्याही कारणामुळे निवडणुका पुढे ढकलण्याचा अधिकार नसून तसा प्रयत्न केला जाऊ नये," असेही सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाकडून सांगण्यात आले.

**२० डिसेंबरपर्यंत आचारसंहिता कायम**

काही ठिकाणी मतदान आधी पार पडले असले, तरीही निकाल घोषित करण्याची तारीख बदलता येणार नाही, असे उच्च न्यायालयाने नमूद केले होते. यासोबतच २० डिसेंबरपर्यंत आचारसंहिता कायम राहील, असेही न्यायालयाने स्पष्ट केले होते. या निर्णयांवर सर्वोच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केला आहे. याशिवाय, एक्झिट पोल प्रसिद्ध करण्यास बंदी असल्याचे न्यायालयाकडून सांगण्यात आले आहे.

### मुंबईकरांनो उद्या चुकूनही 'या' रस्त्याकडे जाऊ नका!

## दिवसभर ट्रॅफिकमध्ये अडकून पडाल

**■मुंबई। प्रतिनिधी,**

सामान्यपणे तुम्ही मुंबई आणि उपनगरांमध्ये राहत असाल तर रविवारी रेल्वेच्या मेगाब्लॉक असल्याच्या बातम्या अनेकदा वाचल्या असतील. मात्र मुंबईला गुजरातशी कनेक्श करणाऱ्या एका महत्त्वाच्या मार्गावर रविवारी म्हणझेच ७ डिसेंबर रोजी मेगाब्लॉक असणार आहे. शहरातील वाहतुकीचा महत्त्वाचा भाग असलेल्या या रस्त्यावर तुम्ही उद्या चुकून गेलाच तर डिसेंबरमधील पहिलाच रविवार तुमचा वाहतूककोंडीमध्ये जाऊ शकतो.

मुंबईकडून गुजरातला जाणाऱ्या प्रमुख मार्गांपैकी एक असलेला राज्य महामार्ग ८४ म्हणजेच घोडबंदर रोडवरील दुरुस्तीचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. गायमुख ते फाऊंटनदरम्यान रस्त्याच्या दुरुस्तीच्या कामातील अंतिम टप्प्यात आहे. रविवार, ७ डिसेंबर रोजी याच कामाचा एक भाग म्हणून ग्राऊटिंग व मास्टिक अस्फाल्टचे काम करण्यात येणार आहे. या कामासाठीच घोडबंदर रोड अवजड वाहनांच्या वाहतुकीसाठी दिवसभर बंद ठेवण्यात येणार आहे.

शनिवार मध्यरात्री १२ ते रविवार मध्यरात्री १२ या कालावधीत संपूर्ण रस्ता बंद राहणार आहे. यावेळी प्रवाशांची वाहतूककोंडी होऊ नये म्हणून पयार्यी मार्गांची व्यवस्था करण्यात आली आहे.

**कसे असतील निर्बंध :**

- अवजड वाहनांसाठीः मुंबई आणि ठाणेकडून घोडबंदरकडे जाणाऱ्या अवजड वाहनांना माजिवडा व्हाय जंक्शन आणि कापूरबावडी चौकात थांबवले जाईल. या वाहनांना 24 तासांसाठी बंदी आहे.
- हलकी वाहनेः ठाणेकडून घोडबंदरकडे जाणाऱ्या हलक्या वाहनांना गायमुख चौकीवरून चुकीच्या बाजूने जाण्याची परवानगी आहे, आणि फाऊंटन हॉटेलसमोरच्या कटमधून पुढे जाऊ शकतात.
- मिरा-भाईंदर महानगरपालिकेद्वारे फाऊंटन हॉटेल ते काजुपाडा भागात दुरुस्ती होत आहे, ज्यामुळे वाहतुक व्यवस्था पूर्णपणे बदलली जाईल.

**पर्यायी मार्ग :**

- मुंबई/ठाण्याकडूनः व्हाय जंक्शनवरून सरळ नाशिक रोडमार्गे खारेगाव टोल प्लाझा, मंकोली, आणि अंजुरफाटा मार्गे. कापूरबावडी जंक्शनवरून उजवीकडे वळून कशेळी आणि अंजुरफाटा मार्गे.
- मुंब्रा/कलवा येथूनः खारेगाव टोल प्लाझापूर्वी थांबवून खारेगाव बे ब्रिज, खारेगाव टोल प्लाझा, मंकोली, आणि अंजुरफाटा मार्गे.
- नाशिककडूनः मंकोली नाक्यावर थांबवून मंकोली ब्रिजखाली उजवीकडे वळून अंजुरफाटा मार्गे.

## राजस्थानात मोठा दहशतवादी कट उधळला

### राजस्थानमधील राजसमंद येथे स्फोटकांनी भरलेली पिकअप व्हॅन जप्त

**■मुंबई। प्रतिनिधी,**

फरीदाबाद मॉड्यूल आणि दिल्ली बॉम्बस्फोटांनंतर, राजस्थानमधील राजसमंद येथे एका पिकअप व्हॅनमधून मोठ्या प्रमाणात स्फोटके जप्त करण्यात आली असल्याने मोठा दहशतवादी कट उधळून लावण्यात आला आहे. राजस्थान पोलिसांनी राजसमंदमध्ये ही स्फोटके जप्त केली. ती राजस्थानमधील आमेड येथून नाथद्वारा येथे पिकअप व्हॅनमध्ये नेली जात होती. व्हॅनची झडती घेत असताना पोलिसांनी ही स्फोटके जप्त केली. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात घबराट पसरली आहे. पोलिसांचे पथक घटनास्थळी उपस्थित असून संपूर्ण प्रकरणाचा तपास सुरू आहे.

राजसमंदमधील श्रीनाथजी पोलिसांनी एका पिकअप व्हॅनमधून स्फोटके जप्त केली. त्यानंतर संपूर्ण परिसरात पोलिसांनी सतर्कतेचा इशारा दिला आहे. पोलिसांच्या मते, पिकअप व्हॅनमधील स्फोटकांचा स्फोट झाला असता तर त्याचा १० किमीपर्यंतच्या परिसरात परिणाम झाला असता. तथापि, ही स्फोटके कुठे नेली जात होती ते अद्याप कळलेले नाही. पोलीस पिकअप व्हॅनच्या चालकाची चौकशी करीत असून अनेकांची नावे समोर आली आहेत. त्या सर्वांचा कसून शोध घेतला जात आहे.




## वसई विद्यार्थिनी मृत्यू प्रकरण! शिक्षण विभागाची मोठी कारवाई, तीन अधिकाऱ्यांना केलं निलंबित

**नेमकं प्रकरण काय?**

शाळेमध्ये पोहचण्यासाठी दहा मिनिटे उशीर झाल्याचा राग शिक्षिकेला आला. राग अनावर न झालेल्या शिक्षिकेने विद्यार्थिनीला 100 उठाबशा काढण्याची भयावह शिक्षा ठोठावली. या जीवापेक्षा मोठ्या शिक्षेमुळे विद्यार्थीनींची तब्येतच बिघडली व तिला रुग्णालयात दाखल कराव लागलं, पण दुर्देवाने उपचारांदरम्यान तिचा मृत्यू झाला. ही संतापजनक घटना वसई पश्चिममधील सातीवली परिसरातल्या श्री हनुमंत विद्या हायस्कूलमध्ये घडली आहे. या घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी मुलीच्या पालकांनी केली होती. पोलिसांनी शाळेत व रुग्णालयात जाऊन याप्रकरणी अधिक चौकशी केली होती. घटनेची माहिती मिळाल्यानंतर शाळेला भेट दिली. मात्र, शनिवार असल्याने कोणीही भेटले नाही. शाळेतील दोन शिक्षिका भेटल्या. मात्र, कोणतेही रेकॉर्ड बघायला मिळाले नाही तसेच कुठलीही माहिती मिळाली नाही. दरम्यान, या प्रकरणी शिक्षण विभागानं आता मोटी कारवाई केली आहे.

**■वसई। प्रतिनिधी,**

वसईच्या सातीवली येथील श्री हनुमान विद्या मंदिर शाळेत एका शिक्षिकेने शिक्षा म्हणून दिलेल्या उठाबशांमुळे विद्यार्थिनीचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. या घटनेनंतर शिक्षण विभागाने मोठी कारवाई केली आहे. पालघर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांनी तीन शिक्षण अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित केले आहे.

शाळेतील एका शिक्षिकेने विद्यार्थ्यीनीला उठाबशा काढायची शिक्षा दिली होती. त्यानंतर विद्यार्थिनी काजल उर्फ अंशिका गौड हिची प्रकृती बिघडली आणि तिचा मृत्यू झाला. या घटनेमुळे पालक आणि नागरिकांमध्ये संतापाची लाट पसरली होती. या घटनेची माहिती वरिष्ठांना न देणे, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष करणे आणि अनधिकृत शाळांवर कारवाई न करणे याबद्दल वसई प्रभारी गटशिक्षण अधिकारी पांडुरंग गलांगे, वसई पंचायत समिती शिक्षण विस्तार अधिकारी राजेंद्र उबाळे आणि वालीव केंद्रप्रमुख कैलास चव्हाण या तीन अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे.




सातीवली परिसरात अनधिकृतपणे वर्ग चालत असल्याच्या तक्रारी अनेक वर्षांपासून प्रलंबित होत्या. तरीही शिक्षण विभागाकडून योग्य ती कारवाई न झाल्याने नागरिकांनी वारंवार यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष आणि वेळेत माहिती न देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर पाऊल उचलत प्रशासनाने दाखवून दिले आहे की अशा निष्काळजीपणाला कोणतीही मुभा दिली जाणार नाही.

## उल्हासनगरात रागाच्या भरात २ अल्पवयीन मुलांना टोचले गुरांचे इंजेक्शन

**■उल्हासनगर। प्रतिनिधी,**

मानवी संवेदना सुन्न करणारी आणि पालकांच्या सुरक्षाभावनेला धक्का देणारी अशी एक धक्कादायक घटना उल्हासनगरमध्ये घडली आहे. रागाच्या भरात एका व्यक्तीने दोन अल्पवयीन मुलांना गुरांसाठी वापरण्यात येणाऱ्या इंजेक्शनची सुई टोचल्याचे समोर आले असून, या घटनेमुळे परिसरात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. मुलांना घाबरवून हाकलण्यासाठी आरोपीने केलेले कृत्य अमानवी व भयकारी असल्याचे नागरिकांनी म्हटले आहे. संबंधित आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहितेप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना ३ डिसेंबर रोजी रात्री सुमारे ९ वाजता उल्हासनगर-२ येथील कुंजबिहारी तबेला समोर, आझादनगर, शिवमंदिराजवळील रामभाऊ म्हाळगी चौक परिसरात घडली. या ठिकाणी धैर्य मुकेश गुप्ता आणि त्याचा मित्र युवराज विजय शर्मा (१२) हे दोघे रस्त्यावर उभे होते.

**दरम्यान, अज्ञात कारणावरून संतापलेल्या आरोपी कन्हैया कुंजबिहारी यादव उर्फ शिवा यांनी आपल्या हातात असलेली गुरांसाठी वापरण्यात येणारी इंजेक्शनची सुई निष्काळजीपणे दोन्ही मुलांच्या कमरेखाली टोचली. अचानक झालेल्या या हल्ल्याने मुले घाबरून गेली आणि त्यांना तत्काळ आरोग्य तपासणीसाठी नेण्यात आले.**

प्राण्यांसाठी वापरण्यात येणाऱ्या इंजेक्शनची सुई मानवी शरीरासाठी गंभीर दुष्परिणाम करू शकते, त्यामुळे मुलांच्या आरोग्याबाबत विशेष काळजी घेण्यात येत आहे. या घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांमध्ये संताप पसरला असून दोषींवर कठोर आणि तत्काळ कारवाई करण्याची मागणी होत आहे. फियार्दी मुकेश गुप्ता यांच्या तक्रारीनुसार पोलिसांनी आरोपी कन्हैया कुंजबिहारी यादव उर्फ शिवा याच्यावर गुन्हा दाखल केला आहे. वैद्यकीय अहवाल मुलांवर वापरलेल्या इंजेक्शनच्या संभाव्य परिणामांचा ठराव करण्यात महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

## लेक गाढ झोपेत, मध्यरात्री बापाने गळ्यावर ब्लेड फिरवली, सत्य समजल्यानंतर...

**■मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबईतील दहिसरमध्ये एका धक्कादायक घटनेत, दारूच्या व्यसनी असलेल्या बापाने झोपलेल्या आपल्या पोटच्या 14 वर्षीय लेकीच्या गळ्यावर ब्लेडने वार केला. इतकेच नाही तर तिला वाचवायला आलेल्या आईवरही त्याने हल्ला केला. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. पोलिसांनी आरोपी हनुमंत सोनवळला अटक केली असून त्याच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी हनुमंत सोनवळ याला दारूचं व्यसन आहे. तो पत्नी राजश्रीच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला मारहाण करत असे. यामुळे राजश्रीने वांद्रे कोर्टात घटस्फोटासाठी केस दाखल केली होती. सोमवारी रात्री उशिरा राजश्री एका वकिलांकडून घटस्फोटाच्या केसची माहिती घेऊन घरी आली. त्यावेळी हनुमंतने तिला कुठे गेली होतीस? असं विचारत त्रास दिला आणि पत्नी व मुलीला मारण्याची धमकी दिली. यानंतर त्यांच्यात जोरदार वाद झाला. रात्री सव्वादोनच्या सुमारास मुलगी झोपेत असताना तिला गळ्याजवळ काहीतरी चावल्यासारखं वाटलं आणि तिला वेदना झाल्या. त्यावेळी तिला वडिलांनीच आपल्या गळ्याजवळ ब्लेडनं वार केल्याचं लक्षात आलं. त्यानंतर तिने आरडाओरड केल्यावर तिला वाचवण्यासाठी धावून आलेल्या आईच्या पोटावरही हनुमंतने ब्लेडने वार केला. या घटनेनंतर नातेवाइकांनी पोलिसांना माहिती दिली. जखमी मायलेकींना शताब्दी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.




**दारुच्या व्यसनामुळे नेहमी भांडण**

पती दारूच्या आहारी गेल्याने पत्नीसोबत रोज क्षुल्लक कारणांवरून वाद घालत असे. तसेच तो वारंवार पत्नीवर संशय घेत असे. या रोजच्या त्रासाला कंटाळून पत्नीने नुकतेच एका वकिलांना भेटून घटस्फोटाबाबत चौकशी केली होती. सोमवारी पत्नी उशिरा घरी परतल्यावर संशयिताने पुन्हा वाद घातला. पत्नीने घर विकून पुण्याला जाण्याची इच्छा व्यक्त केली होती, त्यानंतर दोघांमध्ये शाब्दिक वाद झाला आणि पती घराबाहेर पडला. सोमवारी रात्री उशिरा पत्नी आणि मुलगी झोपल्यानंतर काही तासांनी घरात परतलेल्या आरोपी बापाने झोपलेल्या मुलीवर वार केले आणि नंतर पत्नीवरही हल्ला केला. यात दोघी जखमी झाल्या असून दहिसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस तपास करत आहेत.



# संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

## राजकीय वर्तुळात नाराजीचे वातावरण



अविनाश पाठक मतमोजणी १९ दिवस पुढे ढकलली गेल्यामुळे सर्व ठिकाणच्या ईव्हीएम मशीन स्ट्राँग रूममध्ये बंद झालेल्या आहेत. आता त्या ठिकाणी उमेदवारांचे प्रतिनिधी पहारे देत असल्याचे दिसून येत आहेत. गोंदिया जिल्ह्यात काही ठिकाणी उमेदवारांचे प्रतिनिधी आणि शासकीय अधिकारी यांच्यात वादावादी झाल्याने राडे देखील झाल्याचे दिसून आले आहेत. नागपूर जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे सलील देशमुख यांनी देखील या स्ट्राँग रूमच्या सुरक्षेबद्दल प्रश्न उपस्थित केले आहेत. मतमोजणी होईपर्यंत असे प्रकार आता होतच राहणार आहेत. मात्र आता सर्वांचे लक्ष २१ डिसेंबरकडे लागलेले दिसून येत आहे. त्यादिवशी गुलाल कुणाचा हे निश्चित होणार आहे. महाराष्ट्रात नगर परिषद आणि नगरपंचायत निवडणुका जाहीर झाल्या. त्यात विदभार्तील ८० नगर परिषदा आणि २० नगरपंचायती यांचाही समावेश होता. त्यानुसार निवडणुकीची अधिसूचना जाहीर झाली. अर्ज भरले गेले अर्ज मागे घेण्याची तारीख उलटून सर्व उमेदवारांचे प्रचारही सुरू झाले. मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांच्यासह राजकीय नेत्यांची विदर्भात वर्दळ सुरू झाली. एकूणच विदभार्तील राजकीय वातावरण चांगलेच तापायला सुरुवात झाली होती. मात्र अचानकच मतदानाला अवघे २ दिवस उरले असताना काही ठिकाणी या प्रचाराला ब्रेक लागला. विदभार्तील ७ नगर परिषदांमध्ये निवडणुकांना निवडणूक आयोगाने स्थगिती दिली. याशिवाय विविध नगर परिषदांमधील ५१ जागांवरील निवडणुकांना देखील स्थगिती देण्यात आली. स्थगिती मिळालेल्या नगर परिषदांमध्ये यवतमाळ, वाशिम, बाळापूर, देवळी, घुगुस, अंजनगाव सुर्जी, आणि देऊळगाव राजा यांचा समावेश होता. तर रामटेकमध्ये १ सदस्य, नरखेडमध्ये २, कोंढाळी २, कामठी २, वर्धा २, पुलगाव २, हिंगणघाट ३, वणी १, दिग्रस ३, पांढरकवडा २, गोंदिया ३, गडचांदूर १, मूल १, बल्लारपूर १,वरोरा १, रिसोड २, दयार्पूर १, अचलपूर २ वरूड १, धारणी २ गडचिरोलीतील आरमोरी १, खामगाव ४, शेगाव २, जळगाव जामोद ३ आणि भंडारा २ अशा नगर परिषदांमध्ये सदस्यांच्या निवडणुकांना देखील स्थगिती देण्यात आली. या निर्णयामुळे संपूर्ण महाराष्ट्रात जशी राजकीय वतुर्ळात खळबळ उडाली, तशीच विदर्भातही सर्वत्र खळबळ उडाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील निवडणूक आयोगाच्या या निर्णयावर नाराजी व्यक्त करत कोणत्या कायद्याच्या आधारे या निवडणुका स्थगित केल्या ते कळत नाही अशी शंका व्यक्त करत राज्य शासनातर्फे याबाबत निवडणूक आयोगाकडे याचिका दाखल केली जाईल असेही त्यांनी जाहीर केले. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, विधानसभेतील काँग्रेसचे गटनेते विजय वडेट्टीवार, काँग्रेस नेते नाना पटोले, राष्ट्रवादीचे अनिल देशमुख यांच्यासह सर्वच नेत्यांनी या निर्णयाचा निषेध नोंदवला आहे. उर्वरित नगर परिषदांमध्ये आणि नगरपंचायतींमध्ये ठरल्याप्रमाणे २ डिसेंबरला मतदान पार पडले. काही किरकोळ घटना वगळता सर्वत्र मतदान शांततेत पार पडल्याची बातमी आहे. हे मतदान शांततेत पार पडत असतानाच मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात एका याचिकेवर सुनावणी सुरू होती. ही याचिका शकील अहमद अन्सारी, अश्विनी बुरडे आणि सचिन सुटे यांनी दाखल केली होती. राज्यातील ज्या ठिकाणच्या निवडणुका स्थगित केल्या असून त्या २० डिसेंबरला होणार आहेत, त्यांचे मतदान पार पडेपर्यंत उर्वरित निवडणुकांचे निकाल जाहीर केले जाऊ नयेत अशी याचिकाकर्त्यांची मागणी होती. न्यायमूर्ती अनिल किल्लोर आणि रजनीश व्यास यांच्या खंडपीठाने याचिकाकर्त्यांची मागणी मान्य करत महाराष्ट्रातील सर्व नगर परिषदा आणि नगरपंचायती येथे होणाऱ्या निवडणुकांची मतमोजणी २१ डिसेंबर रोजी करण्यात यावी आणि त्यानंतरच निकाल जाहीर करावे असे आदेश दिले. या दरम्यान एक्झिट पोलचे निकाल देखील जाहीर करू नये असेही खंडपीठाने स्पष्ट केले आहे. या निकालामुळे देखील राजकीय वतुर्ळात चांगलीच खळबळ उडाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या निकालाबद्दल देखील नाराजी व्यक्त केली आहे. राज्य शासनाने याबाबत सर्वोच्च न्यायालयात अपील देखील दाखल केले असून हे वार्तापत्र लिहीत असताना त्यावर सुनावणी होत असल्याची माहिती आहे. वार्तापत्र प्रसिद्ध होईल तेव्हा या प्रकरणात न्यायालयाचा काही निकालही आलेला असू शकतो. उच्च न्यायालयाच्या या निकालामुळे आता मतमोजणी १९ दिवस पुढे ढकलली गेली आहे. त्यामुळे सर्वांचेच ताबूत आता थंडावलेले दिसत आहेत. फक्त ज्या ठिकाणी मतदान होत आहे त्या ठिकाणी आता पुन्हा प्रचाराला सुरुवात झालेली दिसते आहे. या सर्व ठिकाणी उमेदवारांचा आतापर्यंत पैसा वेळ आणि मेहनत वाया गेली आहे. त्यामुळे या काळातील झालेला खर्च निवडणूक खर्चात जमा केला जाऊ नये अशी मागणीदेखील पुढे येते आहे. निवडणूक केंद्रांवर मतदान रद्द झाले होते, त्या ठिकाणच्या उमेदवारांना पूर्वी मिळालेले निवडणूक चिन्ह कायम राहणार आहे. मात्र, निवडणूक रद्द झाल्यामुळे वाढलेले निवडणूक खचार्चे मयार्देचे प्रस्ताव कोटार्ने नाकारले आहेत. निवडणूक प्रक्रियेत एकसंधता राहील आणि पुढे ढकललेल्या निवडणुकांच्या परिणामावर कोणत्याही प्रकारचा प्रभाव पडणार नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. यामुळे आदर्श आचारसंहिता २० डिसेंबरपर्यंत लागू राहील, असेही सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे प्रशासन आणि पोलीस यंत्रणेवर मोठा भार येणार आहे. ईव्हीएम आणि स्ट्राँग रूम व्यवस्था, जवळपास २८० मतमोजणी केंद्रे आणि स्ट्राँग रूम २१ डिसेंबरपर्यंत राखीव ठेवावी लागतील. ईव्हीएम सुरक्षिततेसाठी सलग पोलीस बंदोबस्त ठेवावा लागेल. नेमके याच दरम्यान नागपुरात विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन आहे. त्यामुळे विदभार्तील बराचसा पोलीस फौजफाटा नागपुरात व्यस्त राहणार आहे. परिणामी पोलीस यंत्रणेची चांगलीच ससेहोलपट होणार हे स्पष्ट दिसते आहे. निवडणूक निर्णय अधिकारी आणि कर्मचारी यांना दररोज स्ट्राँग रूमची पाहणी करून स्वाक्षरी करावी लागेल. या संपूर्ण प्रकरणामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकडे लक्ष ठेवून असलेल्या मतदारांमध्येही संभ्रमाची स्थिती निर्माण झाली आहे. उमेदवारांनी महिनोंमहिने केलेल्या प्रचारानंतर निकाल पुढे ढकलल्याने त्यांच्यातही नाराजीचे वातावरण आहे. या सर्व घडामोडींमुळे विदर्भात राजकीय वातावरण तापले असून २१ डिसेंबर रोजी जाहीर होणाऱ्या निकालांकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.



## पुतिन भेटीतील 'अर्थ'

तिन यांच्या भारत भेटीची आज जागतिक पातळीवर चर्चा होत असली तरी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत २३व्या भारत-रशिया वार्षिक शिखर परिषदेसाठी भारतात आले आहेत. रशिया-युक्रेन युद्धानंतर राष्ट्राध्यक्ष पुतिन यांचा हा पहिला दौरा आहे. राष्ट्राध्यक्ष पुतिन भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचीही भेट घेतील. रशियाच्या राष्ट्राध्यक्षांसाठी भारताच्या राष्ट्रपती मेजवानीचे आयोजन करतील. रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन यापूर्वी २०२१ मध्ये भारत दौऱ्यावर आले होते. यावेळी त्यांनी २१व्या भारत-रशिया वार्षिक शिखर परिषदेला उपस्थिती लावली होती.

कोणत्याही बलाढ्य राष्ट्राचे प्रमुख आपल्या देशामध्ये भेटीस आल्यावर त्यांच्या कायार्ची, खासगी आयुष्याची, मालमत्तेची, राहणीमानाची प्रसिद्धी माध्यमांमध्ये चर्चा होणे स्वाभाविकच असते. कोणीही राष्ट्राध्यक्ष अथवा त्या त्या देशांचे पंतप्रधान भारत भेटीवर आल्यास आपल्या देशासोबत त्यांचे विविध क्षेत्रांतील गुंतवणुकीचे करार होतात, उद्योगधंद्याची, शस्त्रांची देवाणघेवाण, खरेदीविक्री होते. पण, अन्य देशाचे राष्ट्राध्यक्ष व पंतप्रधान येणे व रशियाचे राष्ट्रपती आपल्या देशात येणे यात फरक आहे.

स्वातंत्र्य मिळाल्यापासून भारताचे आणि रशियाचे मित्रत्वाचे संबंध आहेत. सुबत्तेच्या तसेच पडझडीच्या काळातही दोन्ही देशांच्या मैत्रीमध्ये खंड पडलेला नाही. शेजारील राष्ट्र पाकिस्तान सातत्याने आपल्याला त्रास देत असताना, आपल्या कुरापती काढत असताना, आपल्या देशात दहशतवादी कारवायांना खतपाणी घालत असताना अमेरिकेने सातत्याने पाकिस्तानची पाठराखण केली आहे. त्यावेळी रशियाने आपल्यामागे उभे राहत खऱ्या मित्राची भूमिका जागतिक पातळीवर निभावली आहे. भारत-रशिया मैत्रीमुळेच अमेरिकेचा पूर्वीपासूनच तिळपापड झाला आहे. त्यातूनच अमेरिकेने आपल्यावर वाढीव आयात शुल्काचा(टॅरिफ) भुर्दंड लादलेला आहे. खनिज तेलाची खरेदी हे तर केवळ निमित्त आहे. भारतातील कंपन्या रशियाकडून तेलखरेदी करत असल्याच्या प्रकाराला अमेरिकेचा आक्षेप आहे. त्याबाबत अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प वेळोवेळी आकांडतांडवही करत भारतविरोधी संताप व्यक्त करत आहेत. आपल्या देशात आलेल्या परदेशातील पंतप्रधान, राजे, राष्ट्रपती, राष्ट्राध्यक्ष यांच्या सुरक्षेची जबाबदारी आपली असते. पण जागतिक पातळीवर वाढत चाललेली स्पर्धा, त्यातून निर्माण झालेली राजकीय वैर, भूभाग संपादनांची महत्त्वाकांक्षा, हद्दविस्तार करण्याची कार्यप्रणाली यातून राष्ट्रपती, पंतप्रधान यांच्या जीवाला धोका वाढलेला असतो. त्यामुळे अमेरिका, रशियासारख्या राष्ट्रांचे प्रमुख स्वतःसोबत आपली सुरक्षाही घेऊन फिरत असतात. त्यांचा आपल्या सुरक्षा व्यवस्थेवर विश्वास असतो. या दौऱ्यादरम्यान पुतिन त्यांच्या अधिकृत कारमधून प्रवास करत आहेत. रशियाची राष्ट्राध्यक्षांसाठी असलेली अधिकृत सरकारी कार ह्यऑरस सेनेट लिमोझिनह्ण आहे. ही कार शस्त्रभेदी गोळ्या आणि ग्रेनेड हल्ल्यांना तोंड देऊ शकते. यात पंक्चर झाल्यावरही चालणारे टायर, आपत्कालीन दरवाजे आणि रशियाच्या फेडरल प्रोटेक्टिव्ह सर्व्हिसच्या मानकांनुसार बनवलेली सुरक्षा आहे. पुतिन यांच्या दौऱ्यावर अमेरिकेसह, युरोप, चीन आणि पाकिस्तान या देशांचे लक्ष आहे. कारण रशिया आणि भारतामध्ये जे करार होतील, त्याचे दूरगामी परिणाम या देशांवर होऊ शकतात. म्हणून पुतिन यांचा भारत दौरा महत्त्वाचा आहे. दोन्ही देशांमध्ये क्रूड ऑइल करार, संरक्षण आणि मुक्त व्यापार करारावर (एफटीए) यासह विविध विषयांवर चर्चा होण्याची शक्यता आहे. पुतिन यांच्या या दौऱ्यात सर्वाधिक लक्ष संरक्षण करारावर असेल. दोन्ही देशांच्या नौदलांसाठी एकत्रितपणे युद्धनौका योजनांवर चर्चा होण्याची शक्यता आहे.

पाकिस्तानच्या अलीकडच्या काळात वाढत चाललेल्या कुरापती पाहता, पुतिन यांच्या दौऱ्यातील संरक्षण चर्चा हा सर्वाधिक लक्ष लागलेला भाग असेल, अशी अपेक्षा आहे. भारत अतिरिक्त एस-४०० हवाई संरक्षण प्रणालीसह अनेक प्रलंबित खरेदी प्रक्रिया पुढे नेण्यास उत्सुक आहे. नागरी अणुऊर्जा हा आणखी एक विषय आहे, ज्यावर चचेर्ची शक्यता आहे. पुतिन यांच्या या भेटीत दोन्ही देश एक नवीन पेमेंट प्रणाली तयार करण्यावर सहमत होऊ शकतात, ज्यामुळे व्यापार अखंडितपणे सुरू राहील. ऐतिहासिकदृष्ट्या, भारत हा रशियाच्या शस्त्रास्त्रांचा सर्वात मोठा खरेदीदार आहे आणि सुखोई-३० विमाने भारतीय हवाई दलाचा भाग आहे. या शिखर परिषदेत संरक्षण मंत्र्यांच्या महत्त्वपूर्ण हार्डवेअर खरेदीबाबतच्या चर्चांचा समावेश आहे. रशियाकडून ५ लाख ८५ हजार कोटी आयात, तर भारताची केवळ ४५ हजार कोटींची निर्यात आहे, या व्यापार असंतुलनामुळे औषधे आणि कृषी उत्पादनांच्या निर्यातीला चालना देण्याची गरज अधिक आहे. रशियाकडून तेल खरेदीमुळे भारतीय वस्तूंवर अमेरिकेने २५-५०% पर्यंत शुल्क लादले आहे. यामुळे भारत-अमेरिकेदरम्यान भू-राजकीय तणाव वाढला आहे. त्यामुळे नवीन करारांवर सावधगिरी बाळगण्याची शक्यता आहे. नागरी अणुऊर्जा आणि युरेशियन मुक्त व्यापार चर्चा यांसारख्या इतर मुद्द्यांवरही लक्ष केंद्रित केले जाईल. क्षेपणास्त्र घटक आणि लढाऊ विमानांच्या अपग्रेडेशनच्या संयुक्त उत्पादनावर लक्ष केंद्रित केले जाईल, ज्यामुळे भारताच्या आत्मनिर्भरतेच्या मोहिमेला बळ मिळेल. हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड विमानांचे उत्पादन करते, भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड इलेक्ट्रॉनिक्समध्ये आणि भारत डायनॅमिक्स लिमिटेड क्षेपणास्त्र निर्मितीमध्ये आघाडीवर आहे. या क्षेत्रात प्रगती झाल्यास बहुवर्षीय करारांची शक्यता निर्माण होऊ शकते, ज्यामुळे गुंतवणूकदारांचे लक्ष निकालापूर्वीच या कंपन्यांकडे लागून आहे. भारत-रशिया मित्र राष्ट्र असली तरी एकमेकांना त्यांनी आजवर व्यापाराच्या माध्यमातून मदत केली आहे. या दौऱ्यात संरक्षण सहकायासीबतच व्यापार आणि ऊर्जा सुरक्षा यावर भर दिला जाईल. अत्याधुनिक शस्त्रास्त्रांसंदभार्तील घोषणांमुळे संरक्षण क्षेत्रातील सार्वजनिक उपक्रमांच्या शेअर्समध्ये तेजी दिसू शकते, अशी बाजार तज्ज्ञांना अपेक्षा आहे. या भेटीमुळे उभय राष्ट्रांमधील संबंध वृद्धिंगत होतील, व्यापार वाढेल, भारत-रशियाविरोधी राष्ट्रांना या भेटीतून चपराक बसेल, अशी आशा बाळगण्यास हरकत नाही.

## शरमेने मान खाली गेली



कोल्हापूरमधील कुस्तीचे आखाडे अवघ्या महाराष्ट्रात प्रसिद्ध आहेत. हार-जीतचा फैसला काही क्षणात आखाड्यातच होतो आणि आखाड्याबाहेर आल्यावर एकमेकांविरुद्ध लढलेले पैलवान पुन्हा मित्र होतात. महाराष्ट्राचाही असाच राजकीय आखाडा बनला आहे. मात्र, या आखाड्यात लढणारे निवडणुकीनंतर मित्र होत नाहीत, हे दुर्दैव आहे. दोन दिवसांपूर्वी म्हणजे २ डिसेंबरला राज्यातील नगरपरिषदा आणि नगरपंचायतींच्या निवडणुका झाल्या. निवडणुकीच्या निमित्ताने राज्य निवडणूक आयोगाने जेवढा घोळ घातला त्यापेक्षा जास्त गोंधळ मतदान सुरू असताना अवघ्या महाराष्ट्राने पाहिला. शांतताप्रिय, शिस्तप्रिय, पुरोगामी या सगळ्या बिरुदांना पायदळी तुडवलेले संपूर्ण महाराष्ट्राने पाहिले. राजकीय पक्षाच्या निष्ठेसाठी एकाच गावात राहणारे, एकाच शहरात राहणारे एकमेकांच्या जीवावर उठलेले पाहून महाराष्ट्राची मान शरमेने खाली गेली. महाराष्ट्रात जे होत नव्हते, होऊ नये, असे म्हटले जायचे ते सर्व झालेले पाहायला मिळाले. खरेतर राजकारण वेगळे आणि वैयक्तिक संबंध वेगळे असतात. राजकीय शत्रू असले तरी व्यक्तिगत मैत्री उत्तम असू शकते, ही महाराष्ट्राची राजकीय संस्कृती राहिली आहे.

खुद्द बाळासाहेब ठाकरे आणि शरद पवार यांच्यात प्रचंड वैचारिक मतभेद होते. दोघांचे राजकीय पक्ष वेगळे होते. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेंनी शरद पवारांवर अनेकदा जाहीर सभेत जहरी टीका केली होती. मात्र, त्यांच्यातील मैत्रीही तेवढीच गाढ होती. राजकीय व्यासपीठावरून टोकाची टीका केल्यानंतरही एकमेकांच्या घरी जाताना किंवा एकत्र आल्यावर राजकीय वहाणा ते घराबाहेर ठेवत असत. यशवंतराव चव्हाण यांनी विरोधकांच्या टीकेचाही सन्मान केला. पातळी सोडून टीका होत नव्हती. दुर्दैवाने आजच्या बहुतांश राजकीय मंडळींना हे जमत नाही. त्यातही कार्यकर्ता पातळीवर याची जाण नसल्याने एकाच गावात, शहरात राहूनही एकमेकांशी भिडतात, शत्रूत्व स्वीकारतात. हे राज्यभरातील दृश्य महाराष्ट्राने २ डिसेंबर रोजी विविध माध्यमांवर पाहिले. निवडणूक हा लोकशाहीचा मोठा आधारस्तंभ आहे. त्यामुळे निवडणुका नेहमीच सकारात्मक दृष्टीने, विकासाच्या मुद्द्यावर व्हाव्यात आणि निरपेक्षवृत्तीने लढाव्यात, अशी अपेक्षा असते. त्यातही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका असतील तर तिथं राजकीय पक्षांपेक्षा स्थानिक आघाड्यांना महत्त्व येते. गावातील किंवा छोट्या शहरातील आपलीच व्यक्ती निवडणुकीला उभी राहते. त्यामुळे तिथे वैचारिक मतभेद असले तरी वैयक्तिक शत्रूत्व नसते. मागील काही निवडणुकांमध्ये हे चित्र बदललेले दिसले. राजकीय पक्षांचे कार्यकर्ते एकमेकांना भिडले होते, त्यांच्यात हाणामार्या झाल्या, रिव्हॉल्वर काढण्यापर्यंत मजल गेली. हे महाराष्ट्राच्या राजकीय संस्कृतीला मुळीच शोभणारे नाही. मात्र, काही वर्षांमधील चित्र पाहिले तर विविध राजकीय पक्षांतील नेत्यांमधील संबंध दिवसेंदिवस ताणलेले आहेत.

जिथे राजकीय नेत्यांमधून विस्तव जात नाही, जे जाहीरपणे एकमेकांच्या उखाळ्यापाखाळ्या काढतात, जे जाहीर असंसदीय शब्दांचा वापर करतात त्यांच्या कार्यकर्त्यांनी नेत्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवल्यास कुणाला आश्चर्य वाटण्याचे फारसे कारण नाही. म्हणूनच नगरपंचायत आणि नगरपरिषदांसाठी मतदान सुरू असताना अनेक ठिकाणी प्रतिस्पर्धी राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी झाली. राजकीय नेते एकमेकांवर चिखलफेक करत असतात. त्यामुळे आपला राजकीय आणि वैयक्तिक शत्रू कोण, हे आता कार्यकर्त्यांना समजू लागले आहे. मात्र, कधी कधी कट्टर राजकीय विरोधक त्यांची राजकीय गरज ओळखून एकत्र येतात, तेव्हा कार्यकर्त्यांना काय करावे सुचत नाही. याचीच जाणीव कार्यकर्ते ठेवत नाहीत. निवडणूक संपली की पुन्हा एकत्र यायचं आणि सर्वांनी मिळून विकासाला हातभार लावायचा, मतभेदाला तिलांजली द्यायची, हे ऐकायला-वाचायला आदर्श वाटत असले तरी प्रत्यक्षात उतरत नाही. कारण निवडणुकीच्या प्रचारात किंवा आधीही समोरची व्यक्ती राजकीय पक्ष म्हणून विरोधक आहे. मात्र, वैयक्तिक भांडण नाही, हे कुणी लक्षात घेत नाही. त्यातच अनेकांची निष्ठा पक्षाशी नसून व्यक्तीशी असते. व्यक्तिपूजेला महत्त्व दिले की मग सारे काही त्या व्यक्तीच्या मनाप्रमाणे करायचे असते, त्यांच्यासाठी निवडणूक लढवायची, त्यांच्यासाठी भांडण करायचे असते, त्यांच्यासाठी विनाकारण दुर्सयाशी शत्रूत्व स्वीकारायचे, असे होत जाते. आताच्या कार्यकर्त्यांनी हाच गुण स्वीकारल्यामुळे आपल्याकडील कार्यकर्ते परिणामांचा विचार करत नाहीत. त्यामुळे पुढचा विचार न करता रस्त्यावर मारामारी करण्यात पुढे होतात, पोलीस केसेस अंगावर घेतात.

हे सर्व या निवडणुकीत दिसले. बरे हाणामारी हा एकच मुद्दा नाही तर लोकप्रतिनिधींनी कसे वागायचे असते, याचेही ताळतंत्र सोडून दिल्याचे दिसले. बुलढाण्याचे शिवसेना आमदार संजय गायकवाड यांच्या मुलाने पोलिसांनी पकडलेल्या बोगस मतदाराला सोडून देण्यास मदत केली. हे सर्व माध्यमांच्या कॅमेऱ्यात कैद झाले आहे. तर हिंगोलीचे शिवसेना आमदार संतोष बांगर यांनी मतदान करताना आता मोबाईल फोन नेला आणि मोबाईलने मतदानाचे दृश्य शूट केले. शिवाय मतदानानंतर तिथेच घोषणा केली. मुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या कानपिचक्यांनंतरही आमदार संजय गायकवाड यांनी माझ्या मुलाची काय चूक झाली, असा सवाल केला. हे सर्व ताळतंत्र सुटल्याचे लक्षण आहे. ही परिस्थिती वेळीच बदलली नाही तर महाराष्ट्रात जंगलराज सुरू झाल्याचे चित्र लवकरच पाहायला मिळेल. अशा प्रकारांवर नियंत्रण आणण्यासाठी ज्येष्ठ राजकीय नेत्यांना आपल्या कनिष्ठ पदाधिकार्यांना शिस्त लागावी म्हणून पावले उचलावी लागतील. तसेच समाजातील बुद्धिजीवींनी पुढाकार घेऊन लोकशाहीला मारक असलेल्या अशा प्रकारांविरोधात चार शब्द सुनावण्याची गरज आहे. कारण आपण सगळे एकाच तळ्यातील मासे आहोत. पाण्याला विषबाधा झाली तर त्याचा फटका सगळ्यांनाच बसणार आहे.

## हृदयी श्रीराम!

आपने मन मोठे अजब आहे. उन्हाळ्यात ते थंडीची वाट बघते आणि गारठून टाकणाऱ्या थंडीत ते 'आता उन्हे तावली पाहिजेत' म्हणत राहाते. बाहेरच्या 'प्रकृती' बाबत जसे मन अशा उड्या मारते तसे स्वतःच्या जीवनाविषयीही ते अशाच कोलांट्या मारते. अनुकूल तेच घडावे, असा वेडा अट्टहास ते करत राहते. जगणे यात्रा आहे, तर रस्ता कधी चढाचा तर कधी उतरणीचा असणार! आहे तसे न स्वीकारता आपण तक्रारच करत राहू तर ही यात्रा निव्वळ वैताग बनून जाईल. 'ठेविले अनंते तैसेची राहावे चित्ती असो द्यावे समाधान' हे संतवचन म्हणजे अकर्मण्यता नाही की पळपुटेपणा नाही. आहे ते आहे तसे पत्करून आपल्याला पाहिजे तसे घडवता येणे, हाच पुरुषार्थ आहे. प्रतिकूलतेतही चित्ताचे समाधान सांभाळणे पलायनवादी नाही. खूप धैर्य लागते तेव्हाच हे शक्य होते. आपण देव मानणारे असू की देव न मानणारे असू, सदाचारी असू की दुराचारी असू... आपण तक्रारच करू तर जीवन कटकट होईल, हे नक्की! बाबा गोस्वामी तुलसीदास यांची एक चौपाई फार नेमका उपाय सुचवते. ते म्हणतात, 'प्रबिसी नगर कीजै सब काजा। हृदय राखी कौशलपूर राजा।। गरल सुधा रिपु करहि मिताई। गोपद सिंधु अनिल सितलाई।।' जीवनाच्या नगरीत प्रवेश करताना हृदयी श्रीरामाला धारण करावे म्हणजे भवताल कसेही असो; अंतरीचा ताल बिघडत नाही आणि प्रतिकूल तेही अनुकूल होऊन जाते. हृदयी राम धरायचा म्हणजे श्रीरामांचे गुण स्थापित करायचे. मयार्दांचे भान हेच श्रीरामस्मरण हे न विसरता कृतज्ञता, सत्यशीलता, करुणा हृदयात धारण करायची. गोस्वामीजी सांगतात की गरल म्हणजे विषही सुधा म्हणजे अमृत होईल. रिपु मित्र होईल. समस्यांचा समुद्रही गाईच्या 'खुरा' इतका छोटा होईल की जो आपण सहज ओलांडून जाऊ शकू.



## शहरे महाग, जनता गरीब!

कैलास ठोळे आज आर्थिक अडचणींमुळे कुटुंबांना निव्वळ जगण्यासाठीही कर्ज घ्यावे लागत आहे. शहरी गरिबांचे जीवन नेहमीच अनिश्चित राहिले आहे; परंतु आता कनिष्ठ मध्यमवर्ग अडचणीत सापडत आहे. घरभाडे, किराणा सामान, शाळेची फी, वाहतूक आणि वैद्यकीय सेवा उत्पन्न यावरील वाढत्या खचार्मुळे पगारदार व्यक्तींनाही जगण्यासाठी कर्ज घ्यावे लागते. त्यामुळे राहणीमानावर होणारा खर्च हे भविष्यातील नाही, तर सध्याचे संकट आहे. लाखो लोक दैनंदिन जीवनात सततच्या आर्थिक तणावाचा सामना करत आहेत. भारतीय कुटुंबांना दीर्घकाळापासून सावध बचत करणारे मानले जात होते. ते विक्रमी पातळीवर कर्ज घेत आहेत. रिझर्व्ह बँकेच्या आर्थिक स्थिरता अहवालानुसार, भारतातील घरगुती कर्ज २०२४ च्या अखेरीस जीडीपीच्या ४२ टक्क्यांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. २०१५ मध्ये हा आकडा सुमारे २६ टक्के होता. सरासरी दरडोई कर्ज फक्त दोन वर्षांमध्ये २३ टक्क्यांनी वाढले आहे. ते राष्ट्रीय उत्पन्नाच्या दुप्पट दराने वाढले आहे. २०२३ मध्ये ३.९ लाख रुपयांवरून मार्च २०२५ मध्ये ४.८ लाख रुपयांपेक्षा अधिक झाले आहे. या कर्जामध्ये अंदाजे ५५ टक्के रक्कम क्रेडिट कार्ड देयके, वैयक्तिक कर्जे, वाहन कर्जे आणि सोने कर्जे यांसारख्या अनिवासी किरकोळ कर्जांचा समावेश आहे, तर पारंपरिक गृह कर्जे एकूण घरगुती कर्जाच्या फक्त २९ टक्के आहेत. शिक्षण, गृहनिर्माण किंवा लहान व्यवसायांसाठी घेतलेले कर्ज भविष्यातील संपत्ती निर्माण करतात; परंतु उपभोगासाठी घेतलेले कर्ज उत्पादक नसते. कुटुंबे आपल्या उत्पन्नाचा जास्त भाग वैयक्तिक कर्जे आणि क्रेडिट कार्ड बिल भरण्यासाठी खर्च करत असल्याने अनेकांकडे बचत किंवा गुंतवणूक करण्यायोग्य पैसे शिल्लक राहत नाहीत. किराणा सामान, वीज बिल, शाळेची फी किंवा आरोग्यसेवा यासारख्या दैनंदिन खचार्साठी कर्ज घेणाऱ्यांची संख्या वाढत आहे. शहरी राहणीमानाचा खर्च वाढत आहे आणि कर्ज या खर्चाचा सामना करण्याची यंत्रणा बनले आहे. आणखी एक चिंताजनक घटक म्हणजे घरगुती आर्थिक बचतीतील घट. सध्याची जीवनशैली टिकवून ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणात कर्ज घेत असल्याने पगारदार तसेच तरुणांमध्ये बचतीचे प्रमाण कमी रहात आहे. एका 'आयआयटीयन'ने अलीकडेच 'एक्स'वर पोस्ट केले होते, की भारतात राहणीमानाचा खर्च वाढत आहे. अगदी लहान, टियर-३ शहरांमध्येही हे होत आहे. निम्न आणि मध्यम वर्ग कसे जगतील किंवा पुढील काही वर्षांमध्ये कसा टिकाव धरतील, असा प्रश्न आहे. अशा वेळी फक्त मूलभूत फळे, भाज्या आणि दैनंदिन जीवनावश्यक वस्तूंना मागणी असेल. आपल्याकडे मूलभूत गरजेच्या काही बाबी फारच जास्त महाग वाटतात. हे संकट भारतातील एक प्रमुख राजकीय मुद्दा का नाही? सामान्य, कष्टकरी भारतीयांच्या दैनंदिन चिंता कोण समजून घेत आहे? प्रश्न अनेक आहेत, पण समाधानकारक उत्तर मिळत नाही. अलिकडेच न्यूयॉर्क शहरात, जोहरान ममदानी महापौरपदाची निवडणूक जिंकले. सत्तेत असलेले बहुतेक भारतीय राजकारणी टाळतात, तेच त्यांनी केले. त्यांनी या संकटावर प्रकाश टाकला. त्यांची मोहीम न्यूयॉर्कच्या कामगार वर्गाच्या भौतिक वास्तवांभोवती बांधली गेली होती. स्थिर भाडे, सार्वत्रिक बालसंगोपन, मोफत सार्वजनिक बसेस, शहरात चालवल्या जाणाऱ्या किराणा दुकाने आणि श्रीमंतांवर जास्तकर या त्यांच्या मागण्या होत्या. ममदानींची अल्पसंख्य ही ओळख (भारतीय वंशाचा युगांडात जन्मलेला मुस्लिम) त्यांच्या मोहिमेच्या यशात एक महत्त्वाचा घटक होता. यामुळे मुस्लिम, दक्षिण आशियाई आणि स्थलांतरितांसारख्या कमी प्रतिनिधित्व असलेल्या गटांमधील मतदार एकत्र आले; परंतु २०२५च्या न्यूयॉर्क शहराच्या महापौरपदाच्या निवडणुकीमध्ये ते त्यांच्या विजयाचे एकमेव कारण नव्हते. ते जिंकले. कारण ते त्यांच्या मतदारांच्या आर्थिक दुःखाबद्दल बोलले आणि त्यांच्या योजनांची रूपरेषा स्पष्ट करणारा अजेंडा सादर केला. भारतात झालेली यासंदभार्तील चर्चा ममदानी यांच्या संबंधांवर आणि ओळखीवर केंद्रित आहे, तर राहणीमानाच्या खचार्ची धाडसी आणि स्पष्ट चर्चा त्यांच्या मोहिमेचा गाभा होती. भारताला ममदानींच्या सूत्राची नक्कल करण्याची गरज नाही. आपल्या शहरांची वेगळी ओळख असून स्वतःच्या मयार्दा आणि राजकीय संस्कृतीही आहेत. ममदानी आणि त्यांना निवडून देणाऱ्या मतदारांकडून आपल्याला प्रचारातील प्रामाणिकपणा शिकण्याची गरज आहे. त्यांनी कोणतेही टाळाटाळ करणारे डावपेच वापरले नाहीत. त्यांनी अस्पष्ट आश्वासने दिली नाहीत. त्यांनी संकटाला तोंड दिले, संभाषण सुरू केले आणि निवार्हाच्या संकटाला राजकीय अजेंड्याचा केंद्रबिंदू बनवले. भारताकडे याचाच अभाव दिसतो. आता ममदानीनाही अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागेल. प्रचारापेक्षा शासन करणे अधिक कठीण असते. भारतीय शहरी राजकारण जे करण्यात अयशस्वी ठरले आहे, ते त्यांनी आधीच केले आहे. त्यांनी राहणीमानाचा खर्च हा एक कायदेशीर, तातडीचा आणि मध्यवर्ती मुद्दा बनवला आहे. त्यांनी आर्थिक दुःख ही सार्वजनिक चिंता मानली, ते वैयक्तिक ओझे मानले नाही. याच सुमारास भारतात रिझर्व्ह बँकेने उघड केले आहे, की लहान कर्जदार दैनंदिन खर्च भागवण्यासाठी कर्ज घेत असताना मोठे कर्जदार कर्ज घेऊन मालमत्ता बांधत आहेत. मोठे कर्जदार विशेषतः घरांसाठी कर्ज घेत आहेत. या लोकांचा क्रेडिट स्कोअर ७२० च्या वर आहे, तर लहान कर्जदारांचा स्कोअर ७२० च्या खाली आहे. रिझर्व्ह बँकेने आपल्या आर्थिक स्थिरता अहवालात म्हटले आहे, की गेल्या तीन वर्षांमध्ये भारतीय घरगुती कर्ज वाढले आहे. हे प्रामुख्याने कर्जदारांच्या संख्येत सतत वाढ झाल्यामुळे आहे. जून २०२४ मध्ये भारतीय घरगुती कर्ज जीडीपीच्या ४२.९ टक्के होते. हे इतर उदयोन्मुख देशांपेक्षा लक्षणीयरीत्या कमी आहे. अहवालानुसार, भारतात घेतलेल्या वैयक्तिक कजार्चे मुख्य प्रकार म्हणजे वैयक्तिक कर्जे, क्रेडिट कार्ड, ग्राहकोपयोगी वस्तू, वाहने, शिक्षण, शेती यासाठी घेतलेले आणि गृहकर्ज. उच्च श्रेणीतील कर्जदारांमध्ये दरडोई कर्जात वाढ आणि मालमत्ता निर्मितीसाठी कजार्चा वापर यामुळे आर्थिक स्थिरता वाढण्याची अपेक्षा आहे, मात्र सामान्यजनांच्या एका कजार्ची परतफेड न झाल्यास सर्व कर्जे एनपीए होऊ शकतात. वैयक्तिक कर्ज किंवा क्रेडिट कार्ड बिल परतफेड करण्यात अयशस्वी झालात तर गृहकर्ज किंवा कार कर्जदेखील अडचणीत येऊ शकते. रिझर्व्ह बँकेच्या अहवालानुसार लहान कर्जावर थकबाकी दिली, तर बँका तुमच्या सर्व कर्जांना एनपीए मानू शकतात. बहुतेक थकबाकी वैयक्तिक कर्जे आणि क्रेडिट कार्डसारख्या असुरक्षित कर्जामध्ये आहे. ज्यांनी या लहान कर्जासह घरे किंवा कारसाठी मोठी कर्जे घेतली आहेत, त्यांना जास्त धोका आहे.आज चीनचे सार्वजनिक कर्ज १४० टक्के इतके सर्वाधिक आहे. जागतिक स्तरावर, २०२४ च्या अखेरीस सार्वजनिक कर्ज जीडीपीच्या ९३ टक्के होईल. याचा अर्थ ते शंभर ट्रिलियन डॉलर्सच्या पुढे जाईल. ३० जून रोजी चीनचे कर्ज ते जीडीपी प्रमाण १४० टक्के होते, तर जपानचे १२० टक्के होते. अनेक कर्जे घेणारे कर्जदार क्रेडिट कार्ड आणि वैयक्तिक कर्ज असलेल्या जवळजवळ अर्ध्या कर्जदारांकडे आधीच दुसरे किरकोळ कर्ज आहे. ही कर्जे बहुतेकदा गृहनिर्माण, वाहने किंवा दोन्हीसाठी असतात. या मोठ्या, सुरक्षित कर्जापेक्षा लहान वैयक्तिक कर्जांना एनपीएचा धोका असतो. वैयक्तिक कर्जे किंवा क्रेडिट कार्ड शिल्लक व्यतिरिक्त इतर किरकोळ कर्जे असलेल्या कर्जदारांमध्ये डिफॉल्टचा धोका हाताळण्यासाठी उचललेली पावले रिझर्व्ह बँकेने अलीकडेच बँका आणि एनबीएफसींसाठी कोणत्याही संभाव्य जोखमींना तोंड देण्यासाठी असुरक्षित कर्जासारख्या काही किरकोळ कर्जावर उच्च जोखीम वजन लादले आहे. ५० हजार रुपयांपेक्षा कमी वैयक्तिक कर्ज असलेल्या ११ टक्के कर्जदारांपैकी ६० टक्क्यांपेक्षा जास्त कर्जदारांनी २०२४-२५ मध्ये तीनपेक्षा जास्त वेळा कर्ज घेतले आहे. यातूनच शहरे वाढली पण लोक कर्जबाजारी तसेच गरीब झाले, असे म्हणता येते.

# पॅनकेक
## झटपट आणि चविष्ट

**साहित्य** :- २ वाटी मैदा किवा गव्हाचे पीठ, ३ चमचे पिठीसाखर, १ चमचा बेकिंग पावडर, अर्धा चमचा बेकिंग सोडा, ३ चमचे तूप, १ ते दिड वाटी दूध. १ चमचा, व्हॅनिला एस्सेंस

**कृती**:- मैदा, पिठीसाखर, बेकिंग पावडर आणि बेकिंग सोडा, व्हॅनिला, मेल्टेड तुप हे सर्व साहित्य व्यवस्थित एकत्र करुन घ्यावे. यानंतर यामध्ये थोडे-थोडे दुध घालून मिश्रण थोडे सैलसर करावे. इडलीच्या मिश्रणाप्रमाणे हे मिश्रण तयार झाले पाहीजे. जास्त पातळ करु नये. आता हे मिश्रण पाच मिनिटासाठी झाकून ठेवावे. यानंतर (अगदी बारीक आचेवर) नॉनस्टीक पॅन वरती थोडेसे तुप लावून घ्यावे, व त्यावर पळीने थोडे-थोडेसे मिश्रण घालावे (फुलक्या एवढेच लहानसे पसरावे). एका बाजुने भाजून दुसया बाजूनेही सोनेरी सर भाजून घ्यावे. ही अगदी साधीसोपी एगलेस पॅन केकेची रेसिपी आहे.



**टिप्स -**

- बेकिंग सोडा आणि बेकिंग पावडर या दोघांचे गुणधर्म वेगवेगळे आहेत. त्यामुळे हे दोन्ही वापरले जाते.
- जर या मिश्रणामध्ये बेकिंग सोडा ऐवजी एक अंडे फेटून घातले तर तो पॅनकेक ही चविष्ट लागतो.

# मजबूत केसांसाठी आहारात सामील करा या वस्तू

केसांच्या सुंदरतेसाठी आपण काय नाही करत.. स्पा, तेलाने मॉलिश आणि वेगवेगळे सौंदर्य प्रसाधने देखील वापरात आहात. परंतु काही आहार आपल्या केसांच्या सौंदर्यतेला आणि बळकटीला परत मिळवून देऊ शकतात. ते ही कुठल्याही प्रकाराचा त्रास न घेता. जाणून घेउया हे 5 आहार ज्यांचा सेवनाने आपल्या केसांच्या समस्यांचं निरसन होऊ शकतं.

**पालक:** पालक खाणं फायदेशीर असतं. आरोग्याबरोबरच हे आपल्या केसांच्या गळतीला ही थांबवत. यात मुबलक प्रमाणात आयरन (लोखंड) मुबलक आढळल्यामुळे केसांसाठी हे वरदान ठरतं.





**गाजर :** लाल गोड गाजर चवी बरोबरच आपल्याला चांगले आरोग्य आणि सौंदर्य देखील देतं. तसेच हे व्हिटॅमिन ए चे चांगले स्त्रोत आहे. त्याच बरोबर यामध्ये असलेले कॅरोटीन आपल्या केसांना आणि डोळ्यांना सुरक्षित आणि सुंदर ठेवतं. आपल्या केसांना मूळापासून हे बळकट करत.

**दही:** दही खाल्याने देखील केसांची गळती थांबते. केस सुंदर आणि चमकदार बनतात. यामध्ये असलेले व्हिटॅमिन बी 6 आणि व्हिटॅमिन डी आपल्या केसांना नवे चैतन्य आणि चांगले आयुष्य देतं.

**रताळे :** ह्याला गोड बटाटा देखील म्हणतात. यात व्हिटॅमिन ए मुबलक प्रमाणात आढळतं. जे आपल्या केसांना बळकट करून केसांची गळती थांबवतं. आपल्या मुळांमध्ये आढळणारं तेल देखील सुरक्षित ठेवतं. जेणे करून आपल्या केसांना पोषण मिळतं.

**बेदाणे :** आपल्या केसांची वाढ होत नसल्यास काळजी करु नये. बेदाणे खाल्याने आपल्या केसांची जलद गतीने वाढ होते. यामध्ये आयरन( लोखंड) आणि मिनरल्स (खनिजे) मुबलक प्रमाणात असतात. जे आपल्या केसांना पोषण देतं.

# कडू कारल्याचे १४ गुणकारी फायदे वाचा आणि लगेच अमलात आणा

हिरव्या भाज्यांमध्ये आपल्याकडे आकर्षित करणारं कारलं चवीला कडू जरी असले, तरी ही त्यापासून मिळणारे अनेक फायदे नक्की गोड आहेत. आपणास ठाऊक आहे का कारल्याचे हे आरोग्यविषयक फायदे ? जर नाही तर मग नक्की जाणून घेऊया कारल्याचे फायदे...



- कारल्यामध्ये फास्फोरस मुबलक प्रमाणात आढळतं. हे कफ, बद्धकोष्ठता आणि पचनासंबंधी समस्या दूर करतं. कारल्याचा सेवनाने अन्नाचे पचन व्यवस्थित होते. तसेच भूक सुद्धा मोकळेपणाने लागते.
- दम्याचा त्रास असल्यास कारलं खूपच फायदेशीर ठरतं. या आजारात कारल्याची भाजी काही ही मसाले ना वापरता देखील भाजी बनवून खाल्याने फायदेशीर ठरतात.
- पोटात गॅस बनत असल्यास आणि अपचनामध्ये कारल्याच्या रस घेणे चांगलेच असते, जेणे करून आपल्यापासून हे आजार लांबच राहतं.
- कारल्याचा रस प्यायल्याने आपले यकृत बळकट होतच, त्याचबरोबर यकृताचे सर्व त्रास बरे होतात. दररोज नियमाने हे घेतल्यास एका आठवड्यात चांगले परिणाम दिसून येतात. कावीळ मध्ये देखील हे फायदेशीर आहे.
- कारल्याची पाने किंवा फळाला पाण्यात उकळवून प्यायल्याने, रोग प्रतिकारक शक्ती वाढते, आणि कुठल्याही प्रकाराचे संसर्ग झाल्यास बरे होतात.
- उलट्या, जुलाब, किंवा कॉलरा झाला असल्यास कारल्याचा रसात काळंमीठ टाकून प्यायलास लगेच आराम मिळतो. जलोदर झाला असल्यास देखील दोन चमचे कारल्याचा रस पाण्यामध्ये टाकून प्यायल्याने फायदा होतो.
- अर्धांगवायूचा त्रास झाला असेल तरी ही कारलं खाणे खूप प्रभावी उपाय आहे. त्यात कच्च कारलं रुग्णासाठी फायदेशीर आहे.
- रक्त स्वच्छ करण्यासाठी देखील कारलं अमृता सारखे आहेत. मधुमेहाचा आजारांसाठी देखील हे प्रभावी मानले आहे. मधुमेह असल्यास एक चतुर्थांश कप कारल्याचे रस, तेवढ्याच प्रमाणात गाजराचा रस पिणे शरीरासाठी फायदेशीर आहे.
- रक्ताळ मूळव्याध झाली असल्यास 1 चमचा कारल्याच्या रसात अर्धा चमचा साखर टाकून प्यायल्यास मूळव्याधीच्या त्रासात आराम मिळतो.
- संधिवात किंवा हातपायाची जळजळ होत असल्यास कारल्याच्या रस चोळणे फायदेशीर असतं.
- मूत्रपिंड (किडनी)च्या त्रासासाठी कारल्याचे उकळलेले पाणी आणि कारल्याचा रस दोन्हीही फायदेशीर असतात. ह्याचा सेवनाने मूत्रपिंड सक्रिय होऊन शरीरातील हानिकारक पदार्थांना शरीराच्या बाहेर काढते.
- हृदयाच्या विकारांसाठी कारलं हे रामबाणच आहे. हे हानिकारक चरबीला हृदयाचा रक्तवाहिन्यांमध्ये जमा होऊ देत नाही. यामुळे रक्त पुरवठा व्यवस्थित होतो आणि हृदयाघात होण्याची शक्यता नसते.
- लिंबाच्या रसाबरोबर कारल्याचे रसाला चेहऱ्यावर लावल्याने मुरूम बरे होतात, आणि त्वचेचे आजार होत नाही.
- कर्करोगाशी लढण्यासाठी कारल्याच्या रसाचे सेवन करणे फायदेशीर ठरते.

# मशरूम खाण्याचे फायदे वाचाल, तर आवडत नसेल तरीही खाल

**कुत्र्याची छत्री** म्हणून ओळखले जाणारे मशरूम म्हणजे वनस्पतीवर वाढणारी नैसर्गिक खाण्यायोग्य बुरशीच असते. वनस्पती आणि प्राणी या दोन्हींचे काही गुणधर्म मशरूम्समध्ये असतात. वनस्पतीत न आढळणारं 'ड' जीवनसत्त्व त्यात असतं. मशरूम्स लो कॅलरी, लो सोडियम आणि फॅट फ्री असल्यामुळे त्यांच्या सेवनामुळे वजन आटोक्यात राहू शकतं, फळांप्रमाणे मशरूम्स ग्लुटेन फ्री असतात. त्यात अ‍ॅन्टीऑक्सिडन्ट्स तर आहेतच, याशिवाय सेलेनियम, कॉपर यांसारखी खनिजं आणि पोटॅशियमही आहे. मशरूम्स हा 'बी' जीवनसत्त्वाचा एक चांगला स्त्रोत आहे. मशरूम पटकन शिजतात, सूप, पुलाव, भाज्या यात त्यांचा उपयोग केला जातो. फक्त मशरूम खाण्यायोग्य आहेत की नाहीत, हे बघून घ्यावं लागतं. कारण काही मशरूम्स विषारी असतात.



मुख्य म्हणजे ही फळभाजी पूर्णपणे सेंद्रीय आहे. रासायनिक पदार्थांचा वापरच होत नाही, त्यामुळे ती भेसळ करून बनवता येत नाही. यात असणारे प्रोटीन हे प्राथमिक दर्जाचे आहेत, म्हणजे शरीरास जसे हवे तसे ते आहेत. मशरूमचा वापर ज्या देशात मोठ्या प्रमाणावर होतो, तेथे दरडोई वर्षाला ७० किलोपर्यंत त्याचा वापर होतो. भारतात हे प्रमाण केवळ अर्धा किलो इतके आहे. उच्चभ्रू लोकच याचा वापर करतात. उत्तरेप्रमाणेच तामिळनाडू, कर्नाटक या परिसरातही मशरूमचे उत्पादन घेतले जाते. लग्नसमारंभात या भाजीला मानाचे स्थान आहे. प्रोटीन शरीरात जाण्यासाठी मटन, मासे, दूध, सोयाबीन याचा वापर होतो मात्र शून्य कोलेस्टेरॉल असणारा एकमेव पदार्थ म्हणून मशरूमची ओळख आहे. मशरूम तयार करण्यासाठी लागणारा कच्चा माल म्हणजे शेतीत ज्याला टाकाऊ पदार्थ म्हणून ओळखले जाते अशी सोयाबीन व गव्हाची गुळी, शिवाय साखर कारखान्यात शिल्लक राहिलेला बगॅस (उसाचा रस काढून शिल्लक राहिलेला चोथा) याला सर्वाधिक महत्त्व आहे. २५ दिवसांत या कच्च्या मालाचे खत तयार केले जाते. त्यात कोंबडीची विष्ठा, जिप्सम, डीओसी मिसळून त्यानंतर मशरूमचे उत्पादन मिळण्यासाठी ५० दिवसांचा कालावधी लागतो. पुढील १५ ते २० दिवस हे उत्पादन विक्रीस उपलब्ध होते. आपल्या देशात १९६८ साली आयसीएआर दिल्ली येथे हिमाचल प्रांतातील सोलन येथे मशरूमचे संशोधन करणारे केंद्र सुरू झाले.

# नारळाचे तेल; त्वचेसाठी वरदान

**कित्येक** शतके आपण आपल्याकडे परंपरेने चालत आलेल्या अनेक घरगुती उपायांचा अवलंब करत आलो आहोत. पण जसजसा काळ बदलला, तसतसे हे उपाय देखील काहीसे बदलत गेले. आपल्या आसपासच्या वातावरणामध्ये सतत वाढती कमान असलेले प्रदूषण, आपली बदलती जीवनशैली यांच्यामुळे आपले आरोग्य, त्वचा आणि केस यांच्यावर दुष्परिणाम दिसून येऊ लागले आहेत. त्यामुळे आपल्या आरोग्याच्या बदलत्या गरजांनुसार आपण आपल्या केसांच्या, त्वचेच्या आरोग्याकरिता करत असलेल्या उपायांमध्येदेखील बदल करण्याची गरज आहे. यासाठी बाजारामध्ये अनेक तऱ्हेची प्रोडक्ट्स उपलब्ध आहेत. पण केवळ एका वस्तूने आपण आपली त्वचा, आणि केस यांची उत्तम काळजी घेऊ शकतो, ते म्हणजे नारळाचे किंवा खोबरेल तेल. नारळाच्या वापराने त्वचेवर फ्री रॅडीकल्सचे परिणाम नाहीसे होतात. खोबरेल तेलामध्ये अँटीऑक्सिडंट्सचे प्रमाण जास्त आहे. यामुळे त्वचेतील घातक द्रव्ये बाहेर पडण्यास मदत होते. सर्व प्रकारच्या त्वचेसाठी नारळाचे तेल गुणकारी आहे. याच्या नियमित वापराने त्वचेवरील सुरकुत्या नाहीशा होण्यास मदत होते. नारळाच्या तेलाचे गुण आणखी वाढविण्याकरिता त्यामध्ये कापूर घालून हे तेल चेहऱ्याला लावावे व दहा मिनिटे चेहऱ्यावर राहू द्यावे. या कापूरमिश्रित तेलाने त्वचेची निरनिराळी इन्फेक्शन्स दूर होण्यास मदत होते. हे मिश्रण बनवण्यासाठी शंभर ग्रॅम नारळाच्या तेलामध्ये एक कापुराची वडी मिसळावी. त्वचेवरील भाजल्याचे वण, त्वचेवरील भेगा, त्वचेवर आलेले काळे डाग हटविण्यासाठी कापूर मिश्रित तेल वापरावे.




# गुगल क्रोम मराठीत कसं वापरायचं? जाणून घ्या सोपी पद्धत

**जर** तुम्ही गुगल क्रोम इंग्रजी व्यतिरिक्त मराठी व अन्य भाषांमध्ये देखील वापरता येतं. जाणून घ्या भाषा बदलण्याची सोपी गुगल क्रोम जगभरातील सर्वाधिक वापरल्या जाणाऱ्या वेब ब्राउजर पैकी एक आहे. लोक वेब ब्राउजिंगसाठी गुगल क्रोमला पसंती देतात कारण ह्याचा युजर इंटरफेस सोपा आहे. गुगल क्रोममध्ये अनेक असे फीचर्स आहेत जे उपयुक्त ठरतात. त्यात अनेक भाषांचा सपोर्ट देखील दिला जतो. गुगल क्रोम सुरुवातीपासून इंग्रजी भाषेत येतो पण ह्यात इतर भाषांचा सपोर्ट देखील आहे. जर तुम्हाला इंग्रजी भाषेत ब्राऊजर वापरायचं नसेल तर तुम्ही क्रोम मराठीसह अन्य स्थानिक भाषेत वापरू शकता. गुगल क्रोम वर आपल्या आवडीची भाषा बदलणं खूप सोपं आहे. जर तुम्ही देखील इंग्रजी व्यतिरिक्त क्रोम इतर भाषेत वापरू इच्छित असाल तर हे आर्टिकल तुम्हाला उपयुक्त ठरेल. आज आम्ही तुम्हाला लॅपटॉप, कंप्यूटर, अँड्रॉइड फोनमध्ये गुगल क्रोमची भाषा बदलण्याची सोपी पद्धत सांगणार आहोत.

**पीसी वर क्रोम भाषा बदला**

- गुगल क्रोमची भाषा बदलण्यासाठी तुम्हाला सर्वप्रथम आपल्या लॅपटॉप किंवा कंप्यूटरमध्ये गुगल क्रोम ओपन करावं लागेल.
- त्यानंतर लेफ्ट कॉर्नरवरील तीन डॉट मेन्यू ऑप्शनवर क्लिक करा आणि मग सेटिंग्स वर जा.
- इथे तुम्हाला लेफ्ट कॉर्नरवर Labguages चा ऑप्शन दिसेल.
- आता Add Languages वर क्लिक करा.
- Add Languages मध्ये तुम्हाला मराठीचा ऑप्शन दिसेल. तिथे क्लिक करून तुम्ही क्रोम मराठी व इतर भाषेत वापरू शकता.





- आता रिस्टार्टवर क्लिक करून गुगल क्रोम तुम्ही मराठी वापरू शकता.

**एंड्राइड वर क्रोम भाषा बदला**

- फोनवर गुगल क्रोमची भाषा बदलण्यासाठी सर्वप्रथम तुमच्या अँड्रॉइड फोनमध्ये गुगल क्रोम ओपन करा.
- त्यानंतर टॉप-लेफ्ट कॉर्नरवरील तीन डॉट मेन्यूवर क्लिक करा.
- सेटिंग्समध्ये जाऊन Lanfguages वर जा.
- त्यानंतर गुगल क्रोम वर जाऊन मराठी भाषा निवडा.
- भाषा डाउनलोड झाल्यानंतर रिस्टार्टवर टॅप करा आणि मराठीत क्रोम वापरण्यास सुरुवात करा.

**नोट:** पुन्हा इंग्रजी भाषेत क्रोम वापरायचं असल्यास तुम्ही वरील प्रोसेस पुन्हा फॉलो करू शकता.

# आंघोळीच्या पाण्यात चिमुटभर मीठ मिसळण्याचे ४ आरोग्यदायी फायदे

**बदलत्या** वातावरणाचा परिणाम जसा थेट आरोग्यावर होतो तसाच तो त्वचेवरही होतो. ऋतूमानामध्ये बदल झाल्यानंतर त्वचाविकार जडण्याची शक्यता असते. त्वचाविकार हे काही काळापुरते वाढत असतात. अशावेळेस सुरूवातीच्या टप्प्यामध्ये अनेकदा लोकं आजाराकडे लक्ष देत नाही. जसाजसा त्रास वाढतो तसा त्रास अधिक गंभीर होऊ शकतो. म्हणूनच वेळीच या समस्येला रोखण्यासाठी पाण्यामध्ये चिमूटभर मीठ मिसळा.

**मीठ पाण्याने आंघोळ करण्याचे फायदे –**

- स्कीन इन्फेक्शनचा धोका टाळण्यासाठी आंघोळीच्या पाण्यात मीठ मिसळणं फायदेशीर आहे. या पाण्याच्या आंघोळीमुळे खाज येण्याच्या समस्येपासून सुटका मिळू शकते.
- त्वचेला तजेलदार ठेवण्याची क्षमता मीठाच्या पाण्यामध्ये आहे .कारण मीठ जंतूनाशक म्हणूनही काम करते.
- सांधेदुखीचा त्रास असर्णाया व्यक्तींना मीठाच्या पाण्याने आंघोळ करणं अधिक फायदेशीर आहे.
- कंबरेच्या दुखण्यावरही मीठाचे पाणी फायदेशीर आहे. मीठ आणि पाणी हे मिश्रण जसे जंतूनाशक असते तसेच

# पिस्ता खाण्याचे हे फायदे ऐकून तुम्हीही व्हाल अवाक्

सुकामेवा हे बहुतेकदा श्रीमंती खाणे समजले जाते. आर्थिकदृष्ट्या तर ते श्रीमंत आहेतच; पण पोषक तत्त्वे आणि आरोग्याच्या दृष्टीनेही सुकामेव्यातील अनेक घटक श्रीमंत आहेत. म्हणूनच सुकामेवा खाणं गरजेचं आहे. सुक्यामेव्यामध्ये वापरला जाणारा पिस्ता सर्वांनाच परिचित आहे. पिस्ता हे छोट्या आकाराचे चविष्ट व कठीण कवचाचे पौष्टिक फळ आहे. त्याचे कवच टणक, परंतु द्विदल असते. पिस्त्याच्या गरावर एक साल असते. त्याच्या आतील गराचा रंग हिरवट पिवळा असतो. पिस्त्याचे झाड आकाराने खूप मोठे व डौलदार असते. त्याच्या फांद्या समांतर व सर्व बाजूंनी सारख्या असून पानांनी बहरलेल्या असतात. पिस्त्याची झाडे इराण, अफगाणिस्तान, फ्रान्स, अमेरिका, तुर्कस्तान या भागामध्ये जास्त आढळतात. पिस्त्याला संस्कृतमध्ये म्युकुलका किंवा निकोचक, हिंदीमध्ये पिस्ता, इंग्रजीमध्ये पिस्ताचिओनट व शास्त्रीय भाषेत पिस्तासिया व्हेरा या नावाने ओळखले जाते.



**औषधी गुणधर्म**

पिस्ता चवीला मधुर, किंचित कडवट, उष्ण, वीर्यात्मक असून पित्तकर व कफवातघ्न आहे. तो पचायला जड व धातूंचे पोषण करणारा आहे. पिस्त्यामध्ये कॅल्शिअम, फॉस्फरस, लोह, प्रथिने, खनिजे, तंतुमय व पिष्टमय पदार्थ व जीवनसत्त्व हे सर्व घटक भरपूर प्रमाणात असतात.

**उपयोग -**

- पिस्त्यामध्ये जीवनसत्त्वातील थायमिन, नायसिन, रिबोफ्लेविन, कॅरोटीन हे घटक असल्यामुळे मज्जा संस्थेच्या कार्यासाठी पिस्ता सेवन उत्तम ठरते. दुधामध्ये पिस्त्याची पूड टाकून प्यायल्यास मेंदूचे कार्य उत्तम प्रकारे चालते. थकवा, नैराश्य ही लक्षणे जाणवत नाहीत.
- स्मृतिभ्रंश, विस्मरण जाणवत असेल तर नियमितपणे ४ ते ५ पिस्ते दुधात टाकून खावेत.
- चांगले कोलेस्टेरॉल निर्माण होऊन हृदयविकार टाळण्यासाठी नियमितपणे पिस्ता सेवन करावे.
- बदाम, पिस्ता, खडीसाखर दुधात घालून त्याची खीर बनवावी व ही खीर नियमितपणे रोज सकाळी सेवन केल्यास शारीरिक व मानसिक आरोग्य चांगले राहते.
- पिस्त्यामध्ये विपुल प्रमाणात लोह असल्याने त्याच्या सेवनाने रक्त वाढते.
- पिस्त्याची फुले ही श्वसननलिकेतील व फुफ्फुसातील वाढलेला कफ दूर करतात, म्हणून जुनाट खोकला, सर्दी, दमा यावर ही फुले गुणकारी ठरतात.
- मिठाईच्या शोभेसाठी व चव वाढवण्यासाठी पिस्त्याचा वापर करावा. घरगुती आइस्क्रीम, केक, बिस्कीट करताना सजावटीसाठी पिस्त्याचा वापर करावा.
- पिस्त्यामध्ये पौष्टिक घटक भरपूर असल्याने त्याच्या सेवनाने जंतूंविरुद्धची रोगप्रतिकारकशक्ती वाढते. त्यामुळे लहान मुलांना व रुग्णांना नियमितपणे दुधातून पिस्ते द्यावेत.

**सावधानता**

सहसा पिस्ते खारवून साठवण्याची पद्धत आहे. परंतु असे पिस्ते जास्त प्रमाणात खाणे आरोग्यास घातक आहे. अतिप्रमाणात मिठाचा वापर केल्यामुळे त्यात असणारे पौष्टिक व औषधी घटक काही प्रमाणात नाश पावतात. म्हणून त्याऐवजी न खारवलेले साधे पिस्तेही बाजारात मिळतात. त्यांचा वापर करावा. तेही नुसतेच खाल्ले तरी ते शक्तिदायक, आरोग्यपूर्ण, सकस असतात.

# गरम पाणी पिण्याचे फायदे

**जर** आपण त्वचेच्या समस्येने अस्वस्थ आहात किंवा त्वचेसाठी वेगवेगळी सौंदर्यप्रसाधने वापरून थकला असाल तर दररोज गरम पाणी पिणे सुरू करा. यामुळे आपली त्वचा समस्येतून मुक्तता होईल आणि चेहराही उजळेल.

- सकाळी उपाशीपोटी आणि रात्री जेवल्यानंतर गरम पाणी प्यायल्याने पचन समस्याही दूर होते.
- गरम पाणी पिण्याचे खूप फायदे असतात; ज्यामुळे शरीराला ऊर्जा मिळते. याने कफ आणि सर्दी लवकर दूर होते.
- वजन कमी करण्यातही गरम पाणी खूप मदत करते. गरम पाण्यात थोडं लिंबू किंवा काही थेंब मधाचे मिसळून प्यायल्याने वजन कमी होण्यास मदत मिळते.
- नेहमी तरुण दिसण्याची इच्छा ठेवणाऱ्यांसाठी गरम पाणी एका अतिशय चांगल्या औषधाचे काम करतं.
- दमा, उचकी इत्यादी आजारात आणि तळलेले पदार्थ खाल्ल्यानंतर गरम पाणी खूप उपयोगी असते.



# सडपातळ दिसायचे आहे मग कपड्यांमध्ये या रंगांचा वापर करा

**कपड्यांची खरेदी करताना स्टाईल, वर्क, पॅटर्न असे विविध पैलू पडताळून पाहिले जातात. काही महिला पटकन कपडे खरेदी करतात, तर काही महिलांना निवड करायला बराच वेळ लागतो. अर्थात, कपड्यांच्या खरेदीत रंगांचीही महत्त्वाची भूमिका असते. म्हणूनच आपल्या व्यक्तिमत्त्वाला, बांध्याला साजेशा रंगांची निवड करणं आवश्यक आहे. ठरावीक रंगाच्या कपड्यांची निवड केल्यास स्थूल महिलाही बारीक दिसू शकतात. चला तर मग, अशाच काही रंगांविषयी जाणून घेऊ.**







**गडद रंगाचे कपडे**

काळ्या रंगाच्या कपड्यांमध्ये तुम्ही बारीक दिसू शकता. काळा हा गडद रंग आहे. गडद रंग व्यक्ती बारीक असल्याचा आभास निर्माण करतात. काळ्यासोबतच नेव्ही ब्लू, ब्राऊन, चॉकलेटी, मरून, डार्क ग्रे असे रंगही तुम्ही निवडू शकता.

**गडद रंगाचा बॉटम आणि ब्राईट टॉप**

बारीक दिसण्यासाठी प्रत्येक वेळी एकाच रंगाचे कपडे घालणं गरजेचं नाही. तुम्ही लाईट आणि डार्क रंगांचं कॉम्बिनेशनही करू शकता. गडद रंगाच्या बॉटमवर ब्राईट टॉप घालता येईल. लाल आणि गुलाबी रंगाच्या छटा असणारे कपडेही खरेदी करता येतील. या रंगाचे ब्राईट कपडे तुम्हाला स्लिम लूक देतील. त्यामुळे स्थूल महिलांनी कपड्यांची खरेदी करताना रंगसंगतीकडे अधिक लक्ष द्यायला हवं.

**मोनोक्रोमॅटिक शेड्स**

मोनोक्रोमॅटिक शेड्सही तुम्हाला स्लिम लूक मिळवून देतील. मोनोक्रोमॅटिक लूकमध्ये शरीराचा स्थूलपणा लपतो. मोनोक्रोमॅटिक लूक म्हणजे एकाच रंगाचे कपडे परिधान करणं.

# वसई-विरारमध्ये ८० हजार दुबार मतदार?

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक



वसई-विरार महानगरपालिकेने प्रसिद्ध केलेल्या मतदार याद्यांमध्ये ५२ हजार दुबार मतदार असल्याचे समोर आले. त्यामुळे पालिकेने अशा मतदारांकडून मतदान कुठे करणार? याबाबतचे हमीपत्र लिहून घेण्यास सुरुवात केली आहे. मात्र दुबार मतदारांची ही संख्या मोठी असून ती ८० हजारांच्या घरात असल्याचा दावा बहुजन विकास आघाडीने केला आहे. यासह एका प्रभागातील मतदारांची नावे दुसऱ्या प्रभागात टाकण्यात आली आहेत. त्यामुळे या सर्वांची नावे पूर्ववत करावी आणि दुबार मतदार वगळावे अशी मागणी सुद्धा त्यांनी केली आहे.

वसई - विरार महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी प्रभाग रचना पार पडली. महापालिका क्षेत्रात २९ प्रभाग असून चार स्तरीय प्रभाग रचनेनुसार चार सदस्य निवडून द्यायचे आहेत. प्रभाग रचना पार पडल्यानंतर आरक्षण सोडत प्रक्रिया पालिकेने पूर्ण केली.त्यानंतर मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या होत्या. यासाठी बुधवारपर्यंतची मुदत हरकती आणि सूचना नोंदविण्यासाठी देण्यात आली होती. १ जुलै २०२५ पर्यंतच्या गृहीत धरलेल्या विधानसभा मतदार यादीनुसार पालिका हद्दीत ११ लाख २७ हजार ६४० मतदारांची नोंद आहे. यामध्ये ५२ हजार ३७८ मतदारांची नावे ही दुबार असल्याची माहिती निवडणूक आयोगाकडून मिळाली होती. त्यानंतर पालिकेने दुबार असलेल्या मतदारांकडून मतदान कुठे करणार? याबाबतचे हमीपत्र लिहून घेणार असल्याचे सांगत प्रक्रिया सुरु केली आहे. मात्र दुसरीकडे हरकती आणि सूचना नोंदविण्याच्या शेवटच्या दिवशी बहुजन विकास आघाडीने महापालिका हद्दीत ८० हजार दुबार मतदार असल्याचा दावा केला आहे. तसेच एका प्रभागातील मतदारांची नावे दुसऱ्या प्रभागात टाकण्यात आल्याचे देखील त्यांना निदर्शनास आले आहे. यासह अनेक मतदारांची नावे सारखीच आहेत, फोटो एका मतदाराचा दुसऱ्या मतदाराला एक सारखाच देण्यात आला आहे तर काही ठिकाणी फोटोच नसल्याचे देखील आढळून आल्याचा दावा बविआने केला असून याबाबत त्यांनी महापालिकेला लेखी निवेदन दिले आहे. तसेच या दुबार मतदारांची नावे वगळण्याची मागणी केली आहे.

**शोध मोहीम सुरू :** वसई-विरार महापालिका हद्दीत मतदारांपैकी ५२ हजार दुबार मतदारांची नावे आयोगाने दिली होती. तसेच आता बविआने देखील ८० हजार मतदार दुबार असल्याचा दावा केला आहे. यासाठी आता नऊ प्रभागात नऊ पथके नेमण्यात आली आहेत. त्यांच्यामार्फत ५२ हजारांहून अधिक असलेल्या दुबार मतदारांची पडताळणी करण्यात येणार आहे. त्यानंतर त्यांच्याकडून हमीपत्र लिहून घेतली जाणार आहेत. दुबार मतदारांबाबत आयोगाने जो कार्यक्रम ठरवून दिला आहे त्यानुसार आमचे कामकाज सुरु असल्याचे पालिका उपायुक्त स्वाती देशपांडे यांनी सांगितले.

**मतदार याद्यांवर ८ हजार हरकती - सूचना**

वसई-विरार महानगरपालिकेने मतदार याद्या प्रसिद्ध केल्यानंतर ३ डिसेंबर पर्यंत हरकती आणि सूचना नोंदविण्याची मुदत दिली होती. मंगळवार सायंकाळी उशिरापर्यंत पालिकेकडे ८ हजार ४१६ हरकती आणि सूचना मतदार याद्यांवर नोंदविण्यात आल्या होत्या. बुधवारी सुद्धा हरकती स्वीकारण्यात आल्या आहेत.



### वसई-विरारमध्ये ४ माजी नगरसेवक भाजपच्या गळाला

वसई-विरारमधील बहुजन विकास आघाडीला भाजपने आणखी एक धक्का दिला आहे. बविआचे एकापाठोपाठ एक पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश होत असतानाच बुधवारी चार माजी नगरसेवकांसह काही कार्यकर्त्यांनी भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला आहे. वसई-विरारच्या आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सध्या राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या यशानंतर भाजपने वसई - विरारमध्ये आपले पाय रोवण्यास सुरुवात केली असून महापालिका निवडणुकीवर लक्ष केंद्रित केले आहे. यासाठी महापालिकेवर सलग दोन टर्म सत्ता गाजविलेल्या बहुजन विकास आघाडीला फोडण्याचे प्रयत्न सुरु आहेत. आधी बविआ नेते नितीन ठाकूर, माजी नगरसेवक दिनेश भानुशाली, माजी नगरसेवक महेश पाटील, प्रदीप पवार यासह प्रमुख पदाधिकाऱ्यांचा भाजपने आपल्याकडे खेचल्यानंतर आणखीन चार माजी नगरसेवकांनी बुधवारी भाजपमध्ये पक्ष प्रवेश केला आहे. बविआ माजी सभापती माया चौधरी, माजी नगरसेवक राजेश ढगे, सुषमा दिवेकर, ज्योती राऊत तसेच परिवहन सभापती कल्पक पाटील यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी बुधवारी मुंबई येथील भाजप कार्यालयात भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते पक्ष प्रवेश केला आहे. यावेळी नालासोपारा आमदार राजन नाईक, भाजपा जिल्हाध्यक्ष प्रज्ञा पाटील, माजी जिल्हाध्यक्ष महेंद्र पाटील, मनोज बारोट उपस्थित होते.

# महाराष्ट्र सरकारचा मोठा निर्णय

## ऐतिहासिक करारामुळे नर्सिंग विद्यार्थ्यांसाठी जर्मनीचे दरवाजे खुले



■मुंबई। प्रतिनिधी,

राज्याच्या वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ आणि बाडेन-वुटेमबर्ग राज्याचे मंत्री मॅनफ्रेड लुखा यांनी सह्याद्री अतिथीगृह मुंबई येथे आज (दि.५) संयुक्त जाहीरनाम्यावर स्वाक्षरी केली. यावेळी महाराष्ट्र आणि जर्मनीतील बाडेन-वुटेमबर्ग राज्यादरम्यान नर्सिंग क्षेत्रातील सहकार्य दृढ करण्यासाठी महत्त्वपूर्ण संयुक्त करार करण्यात आला. यामुळे महाराष्ट्रातील नर्सिंग विद्यार्थ्यांनी जर्मनीत प्रशिक्षण घेऊन करिअरची सुवर्णसंधी उपलब्ध झाली असल्याचे वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी सांगितले.

राज्यमंत्री माधुरी मिसाळ म्हणाल्या, "या करारानुसार भाषा प्रशिक्षण, प्रगत कौशल्य विकास, प्रमाणपत्र मान्यतेची प्रक्रिया सुलभ करणे, तसेच जर्मनीत नोकरी स्वीकारणा या नर्सेसच्या सन्मान व संरक्षणासाठी विशेष उपक्रम राबविण्यात येणार आहेत. उच्च दर्जाच्या आरोग्यसेवेच्या दृष्टीने प्रशिक्षित नर्सिंग मनुष्यबळाची निर्मिती हा या कराराचा केंद्रबिंदू असणार आहे. दोन्ही राज्यांतील नर्सिंग शिक्षण संस्था, विद्यापीठे व प्रशिक्षण केंद्रांदरम्यान विद्यार्थीझ प्राध्यापक आदानप्रदान, संयुक्त प्रशिक्षण, अभ्यासदौरे आणि संशोधन उपक्रम राबवून शिक्षणाची गुणवत्ता आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्याचा उद्देश आहे."

याबाबत मंत्री मॅनफ्रेड लुखा यांनी सांगितले, "दोन्ही राज्यादरम्यान नर्सिंग व आरोग्यसेवा क्षेत्रातील सहकार्य वाढवण्यासाठी आराखडा तयार करण्यात येत आहे. कौशल्याधारित आरोग्यसेवेचा विस्तार करणे, संशोधनाला चालना देणे तसेच परदेशी रोजगार संधी उपलब्ध करणे यावर विशेष भर दिला जाणार आहे. या सहकार्यामुळे तरुणांना विदेशात रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊन आरोग्य क्षेत्रातील मनुष्यबळ अधिक प्रशिक्षित व सक्षम होईल."

बाडेन-वुटेमबर्ग राज्याच्या प्रतिनिधी मंडळाने ३० नोव्हेंबर ते ६ डिसेंबर २०२५ या कालावधीत महाराष्ट्र राज्याचा दौरा केला होता. नर्सिंग क्षेत्रातील सहकार्य वाढवणे, प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे व कौशल्य विकासासाठी नवीन मार्ग उभारणे हा या भेटीचा प्रमुख उद्देश होता. या उपक्रमामुळे महाराष्ट्र व बाडेन-वुटेमबर्ग राज्यांमधील आरोग्यसेवा व नर्सिंग क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय भागीदारी अधिक बळकट होणार आहे.

# नोटरींसाठी दिलासादायक निर्णय

## राज्यातील सर्व उपकोषागारांत नोटरी मुद्रांक तिकिटे उपलब्ध

■नवी मुंबई। प्रतिनिधी,

महाराष्ट्रातील नोटरींसाठी महत्त्वाचा निर्णय राज्य सरकारने जाहीर केला असून, आता नोटरी मुद्रांक तिकिटे राज्यातील प्रत्येक उपकोषागारात उपलब्ध होणार आहेत. लेखा व कोषागारे संचालनालयाच्या कोकण विभागाकडून बुधवारी यासंदभार्तील आदेश जारी करण्यात आले. या निर्णयामुळे आतापर्यंत केवळ मुंबईतील मुख्य मुद्रांक पुरवठा कार्यालयातून तिकिटे घेण्यासाठी करावी लागणारी पळापळ अखेर संपणार आहे. ग्रामीण भागातील आणि उपनगरातील नोटरींना या तिकिटांसाठी प्रवास व वेळेचा मोठा खर्च सहन करावा लागत होता. महाराष्ट्र व गोवा नोटरी असोसिएशनच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर हा निर्णय संभवला आहे. संघटनेचे राज्याध्यक्ष सय्यद सिकंदर अली यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्हाध्यक्ष ॲड. नागेश हिरवे आणि सहकाऱ्यांनी संबंधित विभागाशी सतत पाठपुरावा केला होता. याबाबत माहिती देताना असोसिएशनचे प्रवक्ते आणि कोकण विभागाध्यक्ष ॲड. समीत राऊत म्हणाले, नोटरी स्टॅम्प मिळवण्यासाठी अनेकांना मुंबईपर्यंत जावे लागत होते. उपकोषागारांमधून ही सुविधा सुरू झाल्याने हजारो नोटरींचा वेळ व खर्च वाचणार आहे.

### पालिकेला खर्चाची चिंता

प्रधानमंत्री आवास योजनेप्रमाणेच महापालिका स्वतः बायोगॅस प्रकल्प उभारणार आहे. त्यानुसार यासाठी येणाऱ्या खर्चाचा प्रस्ताव तयार करण्याचे काम सुरू करण्यात आले असून खासगी ठेकेदाराच्या माध्यमातून हा प्रकल्प उभारला जाणार आहे. परंतु त्यासाठी येणाऱ्या खर्चाची तरतूद कशी केली जाणार, हे पाहणे आता महत्त्वाचे ठरणार आहे. पीपीपी तत्त्वावर हा प्रकल्प उभारून त्यापोटी ठेकेदाराला येथील जागा १ रुपये प्रतिचौरस मीटर दराने उपलब्ध करून दिली जाणार होती. संबंधित ठेकेदाराला २५ वर्षे कालावधीसाठी हा प्रकल्प चालविण्यासाठी देण्याचेही निश्चित झाले होते.मात्र वारंवार मुदतवाढ दिल्यानंतरही प्रतिसाद मिळत नसल्याने महापालिकेने पुन्हा नवा पर्याय पुढे आणला आहे.

# बायोगॅस प्रकल्प आता पालिकाच उभारणार... पीपीपीला प्रतिसाद न मिळाल्याने ठेकेदाराचा पर्याय

■ठाणे। प्रतिनिधी,

ठाणे महापालिकेच्या माध्यमातून ओल्या कचऱ्यापासून बायोगॅस प्रकल्प उभारण्यात येणार आहे. त्या संदभार्तील महत्त्वाचा प्रस्ताव प्रशासकीय महासभेत मंजूर झाला होता. त्यानंतर हा प्रकल्प पीपीपी तत्त्वावर उभारण्याचे निश्चित करण्यात आले होते. परंतु त्याला प्रतिसाद न मिळाल्याने महापालिकेने आता खासगी ठेकेदार नेमून हा प्रकल्प राबविण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी येणारा खर्चही महापालिका उचलणार असल्याची माहिती महापालिकेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली.

भिवंडी-आतकोली येथे १५ एकर जागेत ५०० टन प्रतिदिन क्षमतेचा हा प्रकल्प उभारण्यात येणार असल्याची माहिती महापालिकेच्या घनकचरा विभागाने दिली. पीपीपी तत्त्वावर हा प्रकल्प उभारून २० वर्षांसाठी तो कार्यान्वित करण्याचे निश्चित केले होते. महापालिकेने केलेल्या सर्वेक्षणात शहरात दरडोई सुमारे ५०० ग्रॅम कचऱ्याची




निर्मिती होत असल्याचे दिसून आले. त्यानुसार महापालिका हद्दीत रोज सुमारे १२०० मेट्रिक टन कचऱ्याची निर्मिती होत असून त्यात साधारण ५० टक्के ओल्या कचऱ्याचा समावेश आहे. सद्यस्थितीत ओल्या कचऱ्यापासून खत निर्मितीसाठी विकेंद्रीत पद्धतीने महापालिका हद्दीत प्रत्येकी ५ टन क्षमतेचे विविध तंत्रज्ञानावर आधारित १६ प्रकल्प कार्यान्वित आहेत. त्याद्वारे सुमारे ८० मेट्रिक टन ओल्या कचऱ्याचे व्यवस्थापन केले जात आहे. तसेच गायमुख परिसरात १९४ टन क्षमतेचे विकेंद्रीत पद्धतीने ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी 'सोलराइज्ड मॅकेनिकल कंपोस्टिंग प्रकल्प' व 'मोबाइल कंपोस्टिंग व्हॅन' प्रस्तावित आहेत.

**तब्बल ५०० टन प्रतिदिन क्षमतेचा बायोगॅस**

भविष्यात वाढती लोकसंख्या विचारात घेता कचऱ्याच्या प्रमाणातही वाढ होणार आहे. त्यानुसार निर्माण होणाऱ्या कचऱ्यावर प्रक्रिया करणे गरजेचे असल्याने महापालिकेने ओल्या कचऱ्यापासून बायोगॅस निर्मिती प्रकल्प उभारण्याचे निश्चित केले आहे. सध्या ठाणे महापालिकेच्या माध्यमातून शहरात निर्माण होणारा कचरा हा भिवंडी येथील आतकोली येथील ३२ हेक्टर जागेत टाकला जात आहे. त्याठिकाणी आता १५ एकर जमिनीवर तब्बल ५०० टन प्रतिदिन क्षमतेचा बायोगॅस प्रकल्प उभारण्यात येणार आहे. या संदभार्तील प्रस्ताव जून महिन्यात झालेल्या प्रशासकीय महासभेत मंजूर करण्यात आला होता.

# कॉलेजात प्रवेश घेतला, पैसे भरले

## पण परीक्षेच्या दिवशी समोर आलं धक्कादायक सत्य




■मुंबई। प्रतिनिधी,

कॉलेजच्या चुकीच्या कारभारामुळे १३३ विद्यार्थ्यांना परीक्षेला मुकावे लागलं आहे. हा प्रकार संभाजीनगरमधील श्री साई इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटमध्ये घडलाय. हे विद्यार्थी कॉलेजमध्ये हॉल तिकीट घेण्यासाठी पोहोचले. मात्र त्यांना कुणीही दाद दिली नाही. त्यामुळे अखेर या विद्यार्थ्यांनी पोलीस स्टेशनची पायरी गाठली आहे. एमसीएच्या प्रथम वर्षात शिकणारे विद्यार्थी परीक्षेला मुकलेत. यामध्ये या विद्यार्थ्यांची कोणतीही चूक नाही. ज्या कॉलेजमध्ये हे शिकत होते त्या कॉलेजचा हा हलगर्जीपणा आहे. कॉलेजने विद्यार्थ्यांकडून पैसे घेतले मात्र विद्यापीठात ते भरलेच नाही.

विद्यापीठांची सलग्नता नव्हती आणि त्यामुळे हॉलतिकीट मिळू शकले नाही. अखेरच्या क्षणी या साई इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट कॉलेजने विद्यार्थ्यांना उत्तर देण्याऐवजी ते पसार झाले आणि विद्यार्थ्यांचं नाहक नुकसान झालं. अखेर नुकसान झालेल्या सगळ्या विद्यार्थी पोलीस स्टेशनमध्ये धाव घेत कॉलेजवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. मात्र रिकाम्या बाकांशिवाय इथं कुणीही नव्हतं. कॉलेजचे अध्यक्ष विक्रांत जाधव यांना झी मीडियाच्या टीमने फोनवरून संवाद साधण्याचा प्रयत्न केला. यावेळी थातूरमातूर उत्तर देत त्यांनी वेळ मारुन नेली. पोलिसांनीही कॉलेजचे अध्यक्ष विक्रांत जाधवांना शोधण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांनाही ते सापडले नाहीत.

### अहवालात काय आहे?

- साई कॉलेजला मान्यताप्राप्त प्राचार्य उपलब्ध नाही
- एमसीए अभ्यासक्रमासाठी लागणाऱ्या संगणकांची संख्या उपलब्धता नाही
- कॉलेजने एमसीए विषयाकरीता पुस्तके प्रत्यक्षात खरेदी केलेली नाही
- संस्था, कुलसचिव यांच्या संयुक्त नावे असलेली मुदत ठेवीबाबत कार्यवाही केलेली नाही
- शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या वेतनाकरीता १० लाख रुपयांची तरतूद केलेले प्रमाणपत्र उपलब्ध नाही
- १५ वर्षांपासून एमबीए हा अभ्यासक्रम चालू असून अद्यापर्यत नॅक कॉलेजने केलेली नाही

# रमाबाई इमारत दुर्घटनेप्रकरण

## वसई-विरार पालिकेचे सहाय्यक आयुक्तांना अटक



■वसई। प्रतिनिधी,

विरार पूर्वेतील नारंगी विजय नगर येथील रमाबाई इमारत दुर्घटनेप्रकरणी महत्त्वाची कारवाई करण्यात आली आहे. तीन महिन्यांपूर्वी कोसळलेल्या इमारतीत १७ जणांचा मृत्यू, तर ९ जण गंभीर जखमी झाले होते. या प्रकरणी मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाच्या गुन्हे शाखा ३ ने मोठी कारवाई करत वसई-विरार महानगरपालिकेचे वादग्रस्त सहाय्यक आयुक्त गिल्सन गोन्साल्विस यांच्यासह सात जणांना अटक केली आहे. तपासात बांधकामातील अनियमिततेसोबतच संबंधित अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणाचाही उल्लेख समोर आल्याने ही कारवाई करण्यात आली आहे. याशिवाय, गोन्साल्विस यांनी शहरात अनेक अनधिकृत बांधकामांना संरक्षण दिले होते, असे सांगितले जात आहे. ३१ जानेवारी रोजी ते सेवानिवृत्त होणार होते. मात्र, त्याच्या काही आठवडे आधीच त्यांना पोलिसांकडून अटक झाल्याने पालिका वतुर्ळात एकच खळबळ उडाली आहे. या कारवाईनंतर स्थानिकांनी दिलासा व्यक्त केला असून पीडित कुटुंबांना न्याय मिळण्याची आशा निर्माण झाली आहे. तपास सुरू असून आणखी काही जणांना अटक होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### रमाबाई इमारतीची दुर्घटना

विरार पूर्वेतील नारंगी विजय नगर येथील रमाबाई अपार्टमेंट या चार मजली इमारतीचा मागील भाग मंगळवार, २६ ऑगस्ट २०२५ च्या मध्यरात्रीच्या सुमारास कोसळला होता. ही इमारत सुमारे १० वर्षे जुनी होती आणि महापालिकेने ती अतिधोकादायक म्हणून घोषित करून नोटीस देखील दिली होती, परंतु त्यावर कार्यवाही झाली नव्हती. इमारतीचा काही भाग कोसळल्यामुळे हा ढिगारा शेजारील चाळीवरही कोसळला, ज्यामुळे अनेक रहिवासी ढिगाऱ्याखाली दबले गेले. या घटनेची माहिती मिळताच ठऊफ्रआणि वसई विरार शहर महानगरपालिकेचे अग्निशमन दल तातडीने घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी युद्धपातळीवर बचावकार्य सुरू केले. सुमारे ३६ तासांहून अधिक काळ चाललेल्या बचावकार्यानंतर, या दुर्घटनेत एकूण १७ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची अंतिम माहिती आहे, तर ९ ते १४ जणांना ढिगाऱ्याखालून सुखरूप बाहेर काढून रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. अरुंद रस्ते आणि दाटीवाटीच्या वस्तीमुळे मदतकार्यात अडथळे येत होते, ज्यामुळे मोठ्या प्रमाणात ढिगारे हातानेच काढावे लागले. ही दुर्घटना गणेशोत्सवाच्या सुरुवातीलाच घडल्यामुळे महाराष्ट्रात हळहळ व्यक्त करण्यात आली होती. यामध्ये एका कुटुंबातील लहान चिमुरडीचा वाढदिवस सुरू असतानाच तिच्यासह आई आणि वडिलांचाही मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना समोर आली होती.

# छत्तीसगडमध्ये मोठी चकमक

## १६ माओवाद्यांचा खात्मा, कमांडर पापा रावला मोठा झटका, ३ जवान शहीद

■मुंबई। प्रतिनिधी,

छत्तीसगडच्या बिजापूर-दंतेवाडा सीमेवर सुरक्षा दल आणि माओवाद्यांमध्ये मोठी चकमक उडाली आहे. या चकमकीत १६ माओवाद्यांचा खात्मा करण्यात आला आहे. छत्तीसगड राज्यातील बिजापूर गंगानूर येथील जंगलातील घटना काल सायंकाळी साडेचार वाजेपासून रात्री साडेआठ वाजेपर्यंत ही चकमक चालली. यात चकमकीत 16 माओवाद्यांना कंठस्नान घालण्यात पोलिसांना यश आले. चकमकीत तीन पोलीस जवान शहीद झाले होते. सायंकाळी ६:०० वाजेपर्यंत पोलिसांनी १२ माओवादी यांचे मृतदेह सापडले आहे. त्यानंतर पहाटे शोध मोहीम राबविण्यात आली त्यात चार माओवाद्यांचे मृतदेह आढळले. या चकमकीत २० ते २२ माओवादी ठार झाले असावे असा पोलीस दलाचा अंदाज आहे.

गंगालूर परिसरातील जंगलात ही चकमक उडाली आहे. हा



परिसर माओवादी कमांडर पापा राव याचा मानल्या जातो. त्याची या परिसरात मोठी दहशत होती. या जंगलात मोठ्या संख्येने माओवादी असल्याची खबर मिळाल्यानंतर सुरक्षा दलांनी चोहोबाजूंनी त्यांना घेराव घातला. त्यानंतर माओवाद्यांनी फायरिंग केली. दोन्ही बाजूने गोळीबार सुरू झाला. त्यात 16 माओवाद्यांना कंठस्नान घालण्यात आले. हा आकडा वाढण्याची शक्यता आहे. तर अजूनही या परिसरात गोळीबार सुरू असल्याचे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. थांबून थांबून माओवादी गोळीबार करत आहेत. तर त्यांना सुरक्षा दल प्रत्युत्तर देत आहेत. मोठ्या संख्येने या परिसरात माओवादी लपल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे सुरक्षा दलांनी व्यापक शोध मोहीम हाती घेतली आहे.

### आतापर्यंत १२ माओवाद्यांचे मृतदेह ताब्यात

आतापर्यंत १२ माओवाद्यांचे मृतदेह ताब्यात आले आहे. पोलीस आणि सुरक्षा दलाकडून या भागात शोध मोहीम राबवण्यात येत आहे. बिजापूरचे पोलीस अधिक्षक डॉ. जितेंद्र यादव यांनी दिलेल्या माहितीनुसार, सकाळी ९ वाजेपर्यंत डीआरजी दंतेवाडा-बिजापूर, एसटीएफष कोबरा आणि उफ्ढ्रच्या संयुक्त पथकाकडून ऑपरेशन सुरु केले. अद्यापही चकमक सुरूच असल्याची माहिती त्यांनी दिली. या संयुक्त पथकाने माओवाद्यांना ताबडतोब प्रत्युत्तर दिले. सुरक्षा दलाने आक्रमक पवित्रा घेतला. बस्तर रेंजचे पोलीस महानिरीक्षक सुंदरराज पी यांनी घटनास्थळावरून १२ माओवाद्यांचे मृतदेह ताब्यात घेतले. या ठिकाणी एसएलआर, ३०३ रायफलसह मोठ्या प्रमाणात शस्त्र, दारुगोळा जप्त केला. मृत माओवाद्यांची ओळख पटविण्याचे काम सुरू आहे. या चकमकीत सुरक्षा दलातील बिजापूरचे प्रमुख मोनू वडाडी आणि दुकारु गोंडे हे शहीद झाले. तर जखमी जवान सोमदेव यादव यांच्यावर उपचार सुरू आहे. चकमक सुरूच असल्याने सुरक्षा दलाने अतिरिक्त कुमक पाठवली आहे.

### जालन्यातून आणखी एक घटनादायक वृत्त समोर...

तिथं शेतात गांजा लावल्याच्या घटनेची चर्चा असतानाच जालन्यातून आणखी एक धक्कादायक बाब समोर आली. बदनापूर तालुक्यातील गेवराई बाजार येथून जालना शहराकडे कत्तलीसाठी गोवंशाची अवैध वाहतूक होत असल्याची माहिती काही गोरक्षकांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे हे वाहन पकडून पोलिसांना माहिती देऊन ताब्यात घेण्यात आलं आहे. यात सात गोवंश आणि एक गाय आढळून आली आहे. या प्रकरणात चंदनझिरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गोवंश जालना शहरात कत्तलीसाठी आणला जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी पिकअपचा पाठलाग करून वाहन अडविले. गोरक्षकांनी वाहनचालकास जनावरांविषयी चौकशी केली असता त्याने उडवाउडवीची उत्तर दिली. चंदनझिरा पोलिसांनी वाहन ताब्यात घेऊन कायदेशीर प्रक्रिया सुरू केली असून गोवंशांच्या सुरक्षिततेची व्यवस्था करण्यात येऊन हा गोवंश शहरातील गोशाळेत सोडण्यात येणार आहे. अवैधरीत्या जनावरांची वाहतूक करत असताना आठवडाभरातील ही तिसरी कारवाई आहे, असे सांगितले. सततच्या कारवायांमुळे परिसरात गोवंश तस्करीचा प्रश्न पुन्हा गंभीररित्या डोकं वर काढताना दिसत आहे.

# कापसाच्या शेतात गांजा, वाऱ्याने दुर्गंधी पसरली अन्...

## महाराष्ट्रात कुठं घडलं १ कोटींचं हे विचित्र प्रकरण?

■जालना। प्रतिनिधी,

गांजाची शेती ऐकूनच डोळे चक्रावतात. महाराष्ट्रात एके ठिकाणी चक्क एका शेतात हा गांजा लावण्यात आला आणि तो विकण्यासाठीची तयारीसुद्धा करण्यात आली. पुढं नेमकं काय घडलं? याचा संपूर्ण घटनाक्रम पोलीस कारवाईनंतर समोर आला आहे. जालन्यातील अंबड पोलिसांनी धाड टाकून एक कोटी रुपये किंमतीचा गांजा जप्त केला आहे. शेतात लावलेल्या गांजाची काढणी करून तो सुकवण्यासाठी शेतात




ठेवलेला असल्याची माहिती जालन्यातील अंबड पोलिसांना मिळाल्यानंतर या माहितीच्या आधारे पोलिसांनी धाड टाकून सुमारे १ कोटी रुपयांचा गांजा जप्त केला. पोलीस तपासातून समोर आलेल्या माहितीनुसार कपाशीच्या शेतात हा गांजा लावण्यात आला होता. ही कारवाई जालना शहरातील दहशतवादविरोधी पथक आणि अंबड पोलिसांनी संयुक्तपणे केली. अंबड तालुक्यातील कौचलवाडी शिवारात ही कारवाई झाली. यात एकूण ४ क्विंटल गांजा जप्त करण्यात आला. गांजा काढून तो सुकवण्यासाठी शेतात ठेवला होता. यामुळे दूरपर्यंत गांजाची दुर्गंधी पसरली होती. या ठिकाणाहून ६० वर्षीय ढवळीराम बारकू चरावंडे याला ताब्यात घेतले आहे. पुढील तपास अंबड पोलीस करत आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com